**सुविचार**

चाहे कोई आपकी निन्दा या अपमान करता है फिर भी उस पर मुस्कान व शुभकामनाओं के पुष्पों की वर्षा करें।

(ब्रह्मकुमारीज)


विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र

# दैनिक यशवंत



महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर
जि. लातूर
प्रवेश सूरू
2023-24
11 th, 12 th & Repeaters
NEET / IIT- JEE
संपर्क : 9423351370, 9890103190
अध्यक्ष : मल्लिकार्जूनअप्पाा गदगेअप्पा मानकरी
सचिव : रामचंद्र पंढरीनाथ तिरूके



✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/गुरुवार दि. २२ फेब्रुवारी २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१०३ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


## भारत जोडो न्याय यात्रेला १ मार्चपर्यंत स्थगिती

नवी दिल्ली : काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या परराष्ट्र दौरा आणि पक्षाच्या महत्त्वपूर्ण बैठकांमुळे नेतृत्वातील भारत जोडो न्याय यात्रेला काही दिवस विश्रांती मिळणार आहे. उद्या, गुरुवार आणि शुक्रवारी न्याय यात्रा स्थगित राहणार आहे. त्याचप्रमाणे येत्या २६ फेब्रुवारी ते १ मार्चपर्यंत न्याय यात्रा राहणार नसल्याचे काँग्रेसकडून आज स्पष्ट करण्यात आले आहे.

गेल्या १४ जानेवारीपासून सुरू झालेली ही न्याय यात्रा मणिपूर ते मुंबई जाणार आहे. आतापर्यंत मणिपूर, अरुणाचल प्रदेश, नागालँड, पश्चिम बंगाल, झारखंड, बिहार, ओडिशा, छत्तीसगड राज्यातून ही यात्रा उत्तर प्रदेशात पोचली आहे. उत्तरप्रदेशातील अमेठी व रायबरेली या दोन प्रमुख जिल्ह्यातून ही यात्रा पश्चिम उत्तरप्रदेश जेथे मुस्लिम बहुल मतदार आहेत. त्या ठिकाणी पोचली आहे. न्याय यात्रा २२ व २३ फेब्रुवारीला पुढे जाणार नाही. न्याय यात्रा २४ फेब्रुवारीपासून पुन्हा मुरादाबाद येथून सुरू होईल.

केंब्रिज विद्यापीठात भाषण

भारत जोडो न्याय यात्रा संभल, अलिगड, हाथरस आणि आग्रा येथे आल्यानंतर पुन्हा २६ फेब्रुवारीपासून ही यात्रा याच ठिकाणी स्थगित राहिल. २६ फेब्रुवारी ते १ मार्चपर्यंत राहुल गांधी केंब्रिज विद्यापीठात भाषण देण्यासाठी जाणार असल्याने ही यात्रा स्थगित केली आहे. तसेच याच काळात लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात दिल्लीतही काँग्रेसच्या बैठका आयोजित केल्या आहेत. या बैठकांना ते उपस्थित राहणार आहेत. यानंतर २ मार्चपासून पूर्ववतपणेही यात्रा धौलपूर येथून सुरू होणार असल्याचे खासदार जयराम रमेश यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र-कर्नाटक सिमा वाद लवकरच सुटणार

बेळगाव : महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेला सीमा खटला महाराष्ट्र नेटाने लढविणार आहे असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी महाराष्ट्र सरकारच्या विशेष अधिवेशनावेळी केलेल्या अभिभाषणात केले. मुंबईतील मंत्रालयात महाराष्ट्र विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनाला मंगळवारी सुरुवात झाली होती.




यावेळी विधिमंडळाच्या संयुक्त सभागृहासमोर राज्यपाल रमेश बैस यांनी केलेल्या अभिभाषणात महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाचा विशेष उल्लेख केला. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेला महाराष्ट्र-कर्नाटक सीमा खटला सर्वोच्च न्यायालयात आहे. सर्वोच्च न्यायालयात सीमा खटला महाराष्ट्र सरकार संपूर्ण नेटाने लढवणार आहे. पूर्ण ताकदीने महाराष्ट्र सरकार तयारी करत आहे. याचबरोबर सीमाभागातील मराठी जनतेच्या हितासाठी अनेक प्रभावी योजना हाती घेण्यात आलेल्या आहेत. तसेच सीमाभागातील मराठी जनतेला आरोग्यसेवा आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत, अशी माहिती राज्यपालांनी दिली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सीमाप्रश्न सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे सीमाप्रश्नांची लवकर सोडवणूक व्हावी, यासाठी वकिलांशी चर्चा करून तातडीने प्रयत्न करावेत, अशी मागणी सातत्याने मराठी भाषिकांतून होत आहे. अशावेळी राज्यपालांनी अभिभाषणावेळी सीमाप्रश्नी महाराष्ट्र सरकार ताकतीने मराठी भाषिकांच्या पाठीशी उभे राहील, असे प्रतिपादन केल्यानंतर सीमाभागातील मराठी भाषिकांनी महाराष्ट्र सरकारच्या भूमिकेचे स्वागत केले आहे. मात्र फक्त आश्र्वासन न देता याबाबत कृती देखील करावी, असे व्यक्त केले आहे. महाराष्ट्र सरकारने सीमाभागातील मराठी भाषिकांना विविध प्रकारच्या आरोग्य सुविधांचा लाभ देण्याचा निर्णय घेतल्यानंतर कन्नड संघटनांच्या दबावाखाली येऊन महाराष्ट्र सरकारच्या योजना मिळवून देण्यासाठी सुरू केलेली केंद्रे बंद करण्यासाठी दबाव टाकला होता. त्यामुळे केंद्र बंद करण्यात आली आहेत. ही बाब केंद्र सरकारच्या निदर्शनास आणून द्यावी आणि मराठी भाषिकांना महाराष्ट्र सरकारकडून दिल्या जाणा-या योजनांचा चांगल्याप्रकारे लाभ व्हावा, यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी देखील होऊ लागली आहे.

मराठी भाषिकांना न्याय मिळणार?

महाराष्ट्र सरकारने सीमा खटल्याची सर्वोच्च न्यायालयात लवकर सुनावणी व्हावी, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मराठी भाषिकांना लवकर न्याय मिळावा, यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करणे गरजेचे आहेत. मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समिती सातत्याने महाराष्ट्र सरकारच्या संपर्कात असून कर्नाटक सरकारची कन्नडसक्ती दूर करण्यासाठी सरकारने केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

# मुंबई उच्च न्यायालयाची सर्व राजकीय पक्षांना नोटीस

मुंबई,२१ फेब्रुवारी (पीएसआय)

राज्यामध्ये बेकायदा बॅनर लावल्यामुळे अनेक अपघात झालेले आहेत. मागील काही महिन्यांपूर्वी पुणे, छत्रपती संभाजीनगर, सातारा, नांदेड या ठिकाणी बेकायदा बॅनरची लोखंडी चौकट कोसळून अपघात झाले. त्यामुळे काहीजण जखमी झाले. यासंदर्भात सुराज्य फाउंडेशनच्यावतीनं जनहित याचिका दाखल करण्यात आली. त्याबाबत आज मुख्य न्यायाधीशांच्या खंडपीठांसमोर सुनावणी झाली. मफ्फ़सर्व राजकीय पक्ष रस्त्यावर, फुटपाथवर आणि सार्वजनिक ठिकाणी खुशाल बेकायदेशीर बॅनर लावतात. त्यामुळे त्यांनी आता आपलं म्हणणं मांडावं तसेच तपशीलवार स्पष्टीकरण द्यावंफ्फ़, अशी नोटीस उच्च न्यायालयानं जारी केलेली आहे. मुख्य न्यायाधीश डी. के. उपाध्याय, न्यायाधीश आरिफ एस. डॉक्टर यांच्या खंडपीठाने ही नोटीस जारी केलेली आहे.

सहा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्रतिज्ञापत्र दाखल: या खटल्याच्या संदर्भात उच्च न्यायालयाकडून मागील सुनावणीच्या वेळी विविध स्थानिक स्वराज्य संस्था यांना प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यामध्ये त्यांनी किती राजकीय पक्षांचे बेकायदेशीर बॅनर नेमके निश्चित केले? त्यांच्यावर काय कारवाई केली? अधिकृत बॅनर लावण्याच्या कोणत्या जागा निश्चित केल्या? याची माहिती न्यायालयानं मागवली होती. त्या संदर्भात नाशिक, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, उल्हासनगर आणि मुंबई महापालिका यांनी प्रतिज्ञापत्र दिले. मात्र, मफ्फ़उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रतिज्ञापत्र दाखल करावं, असे निर्देश न्यायाधीशांनी आजच्या सुनावणीच्या दरम्यान दिले.

बेकायदा बॅनरवर मुख्यमंत्र्यांचे फोटो: याचिकाकर्ता सुराज्य फाउंडेशनचं म्हणणं होतं की, मफ्फ़दोन दिवसांपूर्वी मंत्रालयाच्या परिसरामध्ये राजकीय पक्षांचे बेकायदेशीर बॅनर जागोजागी लावलेले आढळले. यामध्ये भाजपाचे बॅनर सर्वाधिक होते. संवैधानिक पदावर असलेले मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री इतर विविध संवैधानिक पदावर असणारे राजकीय व्यक्ती यांचे फोटो (पान ७ वर)

## युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून उचलबांगडी

मुंबई : काँग्रेसचे माजी नेते बाबा सिद्दीकी यांनी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाकडून एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रीनिवास बी. व्ही. यांनी संघटनेत फेरबदल केले आहेत. देशातील विविध



काँग्रेस पक्षाकडून बाबा सिद्दीकी यांचे चिरंजीव झिशान सिद्दीकी यांची मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून उचलबांगडी करण्यात आली.

काँग्रेस पक्षाकडून मंगळवारी रात्री उशिरा याबाबतचे परिपत्रक जारी करण्यात आले. त्यानुसार मुंबई युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी आता अखिलेश यादव यांची निवड करण्यात आली आहे. तर सुफियान मोह-सीन हैदर यांच्याकडे मुंबई युवक राज्यांमधील पदाधिका-यांमध्ये बदल करण्यात आले असून नव्या चेह-यांना संधी देण्यात आली आहे. दिल्ली, गोवा, अंदमान-निकोबार, कर्नाटक, हिमाचल (पान ७ वर)

# आमच्या संयमाचा अंत पाहू नका

नवी दिल्ली : गेल्या अनेक दिवसांपासून दिल्लीच्या सीमेवर सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलन तीव्र झाले आहे. शेतकरी बॅरकेड्स तोडून दिल्लीत घुसण्याचा प्रयत्न करत आहेत. दरम्यान, शेतकरी नेते जगजितसिंग डड्डेवाल यांनी केंद्र सरकारला स्पष्ट शब्दात इशारा दिला आहे. केंद्रातील एनडीए सरकार अडून बसले आहे, त्यामुळे आम्ही सरकारला दोन पर्याय देत आहोत. पहिला पर्याय शेतक-यांच्या सर्व मागण्या मान्य करा, तर दुसरा शेतक-यांना दिल्लीत जाण्याची परवानगी द्या.

पंजाब-हरियाणाला लागून असलेल्या शंभू सीमेवर बुधवारी सकाळी पत्रकार परिषदेदरम्यान डड्डेवाल म्हणाले, शेतकरी संयमी आहेत, पण आमच्या संयमाचा अंत पाहू नका. देशाने वाईट चित्र पाहू नये, अशी आमची इच्छा आहे. आमचा हेतू अराजकता माजवण्याचा नाही. आम्हाला रोखण्यासाठी एवढे मोठे बॅरिकेड्स लावले, हे योग्य नाही. आम्हाला शांततेने दिल्लीला जायचे आहे. सरकारने बॅरिकेड्स काढून आम्हाला आत येऊ द्यावे, अन्यथा आमच्या मागण्या पूर्ण कराव्यात. आम्ही शांतताप्रिय आहोत, त्यांनी एक हात पुढे केला तर आम्हीही सहकार्य करू. आम्हाला संयमाने परिस्थिती हाताळायची आहे. मी तरुणांना आवाहन करतो की त्यांनी नियंत्रण गमावू नये.

सरकारने एमएसपीचा कायदा करावा : पंढेर


शेतकरी नेते पंढेर म्हणाले की, आम्हाला जेव्हा-जेव्हा चर्चेचे निमंत्रण आले, तेव्हा आम्ही त्यात सहभागी झालो. हात जोडून आम्ही केंद्र सरकारला आमच्यासोबत बसून आमचे प्रश्न सोडवण्याची विनंती केली. प्रत्येक मागणीवर चर्चा झाली, आता निर्णय घेण्याची वेळ आहे. केंद्र सरकारच्या प्रमुखांनी पुढे एमएसपी कायदा करण्यास तयार असल्याचे सांगितल्यावर परिस्थिती शांत होऊ शकते.

अडीच लाख कोटी जास्त नाही

देशातील शेतकरी आईंची मुले आंदोलन करत आहेत. आम्ही आमच्या बाजूने शांत राहणार आहोत. मात्र, निमलष्करी दलांना आमच्या रक्ताची होळी खेळायची आहे. हा देश (पान ७ वर)

# पुतिन यांच्याकडून रासायनिक अस्त्राचा वापर

मॉस्को : रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचे राजकीय विरोधक अलेक्सी नवाल्नी यांचा गूढ पद्धतीने मृत्यू झाला आहे. त्यामुळे रशियात अंशाततेचे वातावरण आहे. नवाल्नी यांच्या हत्येमागे पुतिन यांचा हात असल्याचा संशय व्यक्त केला जातो. पुतिन यांनी आतापर्यंत आपल्या विरोधकांना मारण्यासाठी नोविचोक या विषाचा वापर केल्याचा दावा केला जातो.



नोविचोक हे एक रासायनिक अस्त्र आहे. याच्यावर उपचार नसल्यात जमा आहे. नोविचोकचा रशियामध्ये अर्थ नवागंतूक असा आहे. या विषाचे निदान करणे कठीण मानले जाते. त्यामुळे जेव्हा एखाद्यावर या विषाचा प्रयोग केला जातो, तेव्हा त्याचे वाचणे जवळपास अशक्य असते. नोविचोक नर्व एजेंटला १९७० ते १९८० या काळात विकसित करण्यात आले होते. याला फोलिएंट म्हणून विकसित करण्यात आले होते. नोविचोकचा वापर युद्धादरम्यान केल्याचा आतापर्यंत पुरावा नाही. पण, मार्च २०१८ मध्ये ब्रिटनच्या (पान ७ वर)



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांची राज्यसभेवर बिनविरोध निवड झाल्याबद्दल भाजपा विधिमंडळ पक्ष कार्यालयात आज उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते खासदार चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपा प्रदेश अध्यक्ष श्री. चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजपा अध्यक्ष आशिष शेलार, राज्याचे महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील व राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

# राज्यातील वीज पुरवठा विस्कळीत होणार

नागपूर : कंत्राटी कामगारांच्या संयुक्त कृती समितीने कामगारांच्या मागण्यांसाठी २० फेब्रुवारीला धरणे, २८ फेब्रुवारीपासून दोन दिवस काम बंद तर ५ मार्चपासून बेमुदत काम बंदची नोटीस तिन्ही वीज कंपन्यांसह सरकारला दिली आहे. यामुळे राज्यातील वीज यंत्रणा विस्कळीत होण्याचा धोका आहे.

महावितरण, महानिर्मिती, महापारेषण या सरकारी वीज कंपन्यांमध्ये सुमारे ४२ हजार कंत्राटी कामगार वर्षानुवर्षे कंत्राटी म्हणूनच सेवा देत आहेत. त्यांना स्थायी करण्याच्या मागणीसाठी वेळोवेळी आंदोलन झाले. परंतु, आश्वासनापलीकडे काही मिळाले नाही. त्यामुळे कंत्राटी कामगार संतप्त झाले आहेत. दरम्यान, राज्यातील २५ हून जास्त कामगार संघटनांनी ३ फेब्रुवारीला ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर या गृह शहरात एकत्र येत आंदोलनाचा निर्णय घेतला. त्यानुसार, २१ फेब्रुवारीला राज्यभरात सकाळी १० ते ५.३० दरम्यान धरणे, दुस-या (पान ७ वर)



कु. श्रद्धा परशुराम लखनगीरे सहाय्यक अधीक्षक पदी निवड झाल्या बद्दल काशी विश्वेश्वर मंदिराच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# जिल्हाधिकारी वर्षा घुगे यांच्याकडून परिक्षार्थींचे गुलाब पुष्पाने स्वागत



लातूर / प्रतिनिधी- फेब्रुवारी/ मार्च २०२४ इयत्ता १२वी बोर्ड परीक्षा आज बुधवार दि.२१.०२.२०२४ रोजी सुरू झाली. दयानंद कला महाविद्यालयात परीक्षेचे केंद्र असून या केंद्रावर एकूण ५७० विद्यार्थी परीक्षेसेसाठी देण्यात आलेले आहेत. आज परीक्षेचा पहिलाच दिवस त्यात इंग्रजी या विषयाचा पेपर त्यामुळे विद्यार्थी थोडेसे तणावात असतात. विद्यार्थ्यांनी तणाव मुक्त वातावरणात परीक्षा द्यावी यासाठी महाविद्यालयाने प्रवेश द्वार छान अश्या फुग्यांनी व रांगोळीनी सजवले होते तसेच या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्पाने स्वागत व शुभेच्छा देण्याकरीता लातूर जिल्हयाच्या जिल्हाधिकारी मा. श्रीमती वर्षा ठाकूर घुगे यांना विनंती केली होती. त्या अगदी वेळेवर केंद्रावर येऊन विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

मा. जिल्हाधिकारी यांनी आपल्या मनोगतात शुभेच्छा देताना विद्यार्थ्यांनी कसल्याही तणावाखाली परीक्षा देऊ नये कारण दोन वर्षात तुम्ही जी मेहनत घेतलेली असते त्यामुळे तुम्हाला हि परीक्षा अजिबात कठीण जाणार नाही. म्हणून निर्भीडपणे तणाव मुक्त वातावरणात तुम्ही परीक्षा द्याव्यात. (पान ७ वर)

# समाजासाठी मठ तर मठासाठी समाज : जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन महास्वामिजी

## हणेगाव येथे शंकरलिंग शिवाचार्य महाराजांचा दोन दिवसीय पट्टाभिषेक रजत महोत्सव संपन्न

देगलूर (प्रतिनिधी) : समाजाच्या उद्धारासाठी मठांची निर्मिती केली जाते तर मठाचे गुरुवर्य हे समाज हितासाठीच कार्य करीत धर्माचा प्रचार व प्रसार करतात व आपण सुद्धा तितकीच भक्ती मठावर ठेवता म्हणून समाजासाठी मठ तर मठासाठी समाज आहे असे प्रतिपादन काशीपीठ जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन महास्वामीजी यांनी तालुक्यातील होनेगाव येथे श्री. ष .ब्र. १०८ शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांच्या २५ व्या पट्टाभिषेक सोहळ्यानिमित्त आयोजित धर्मसभेत केली.

हिरेमठ संस्थान चे मठाधिपती श्री श. ब्र. १०८ शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांचा २५ वा पट्टाभिषेक रजत महोत्सव निमित्त सोमवार रोजी धर्मसभा तर काल मंगळवार रोजी नाणे तुलाभार सोहळा मोठ्या उत्साहात, भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.



या कार्यक्रमास काशीपीठ जगद्गुरु श्री श्री श्री १००८ डॉ. मल्लिकार्जुन विश्र्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती,तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप आघाडीचे सौ.प्रणितातांई देवरे चिखलीकर हे होते. कार्यक्रमास केंद्रीय मंत्री भगवंत खुबा,लोकसभा निवडणूक प्रमुख व्यंकटराव पाटील गोजेगावकर,तालुका अध्यक्ष अनिल पाटील खानापूरकर, ॲड.प्रितम देशमुख ,संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष संतोष पाटील,शिवराज पाटील व इतर मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पुढील आशिर्वचनात जगद्गुरु म्हणाले कि भारत देश हा देवदेवतांची ,संतांची भूमी आहे देशाचे राजकीय नेते हे धर्मनिष्ठ असल्यास आपल्या देशाचा उद्धार होऊ शकते.

हणेगाव चे मठाधिपती श्री शंकरलिंग शिवाचार्य महाराज यांनी आपल्या रजत महोत्सव कार्यक्रमात समाजाचा प्रचार, प्रसार व उद्धार करण्यासाठीच मी हणेगाव मठाच्या गादीवर बसलो आहे यामुळे सर्व भक्त गण माझे आहेत आणि या कार्यक्रमास आपण सर्वजण हजारोंच्या संख्येने उपस्थित राहिलात आपले जीवन धन्य झाले असे ते म्हणाले. यावेळी सौ.ज्योती स्वामी बिदर यांनी चांदीचे पूजा साहित्य व सोमनाथ पाटील चांदेगाव यांनी चांदीचे मुकुट शंकरलिंग शिवाचार्य महाराजांना अर्पण केले.

कार्यक्रम प्रास्ताविकात श्री मल्लिकार्जुन स्वामी कौळास म्हणाले सर्वच पाण्याचे मोती बनत नाही शिंपल्या मधील पाण्यानेच मोती बनतो तसे आपले हणेगाव चे गुरू महाराज शिंपल्यातील आहेत.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी जगद्गुरु आणि सर्व शिवाचार्य महाराजांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये शेकडो महिलांनी डोक्यावर कळस धारण केले होते तर शेकडो महिला पुरुष भजनी मंडळ भजन गात तल्लीन झाले होते. कार्यक्रमास महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणा या तीन राज्यातील हजारोंच्या संख्येने भक्त मंडळी उपस्थित होते,कार्यक्रम यशस्वीतेसाठी पट्टाभिषेक रजत महोत्सव समितीच्या सदस्यांनी व गावकर्यांनी आणि भक्तांनी अहोरात्र परिश्रम घेतले. या दोन दिवसीय कार्यक्रमात जवळपास एक लाख भक्तांनी उपस्थिती लावली होती. या सर्वांच्या भोजनाची व्यवस्था समिती तर्फे करण्यात आली होती.

दैनिक
# यशवंत
गुरुवार दि.२२ फेब्रुवारी २०२४ २
# अहमदपूर/चाकूर परिसर
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नारायण दुर्गे

अहमदपूर दि. २१(कारामुंगीकर): राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नारायण दुर्गे यांची निवड करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर तालुक्यातील धसवाडी येथील तंटामुक्त गाव समितीचे माजी अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते नारायण दिगांबरराव दुर्गे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सामाजिक न्याय विभाग (ग्रामीण) जिल्हा उपाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. नारायण दिगांबरराव दुर्गे हे आरोग्य विभागात औषध निर्माण अधिकारी या पदावरून सेवानिवृत्त झाले आ-हेत. सेवानिवृत्तीनंतर तालुक्याच्या



राजकीय, सामाजिक, शैक्षणिक जीवनात कार्यरत असून धसवाडी ता.अहमदपूर येथील तंटामुक्त गाव समितीचे दोन टर्म अध्यक्ष म्हणून राहिले आहेत. आमदार बाबासाहेब पाटील यांचे खंदे समर्थक म्हणून ते ओळखले जा-तात. महाराष्ट्र राज्याचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, माजी मंत्री बाव्ठासाहेब जाधव , आ.बाबासाहेब पाटील, सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा.सुनील मगरे यांच्या सूचनेनुसार या विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रदिप जोंधळे यांनी त्यांची निवड केली आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## रोटरी क्लब अहमदपूरच्या वतीने मुलींसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग, मशीन व डिस्पोजल मशीन चे उद्घाटन

अहमदपूर दि.२१(कारामुंगीकर) रोटरी क्लब अहमदपूरच्या वतीने मुलींसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व डिस्पोजल मशीन चे उद्घाटन करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, रोटरी क्लब अहमदपूरच्या वती-ने विद्यावर्धिनी हायस्कूल अहमदपूर येथे खास मुलींसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व डिस्पोजल मशीन चे उद्धाटन करण्यात आले. रोटरी क्लब ऑफ अहमदपूरच्या वती-ने प्रोजेक्ट असता अंतर्गत शारीरिक आरोग्य जपण्यासाठी अत्यावश्यक बाबी पैकी एक अशा सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व डिस्पोजल मशीन याचे रीत-सर उद्धाटन करण्यात आले.




यាप्रसंगी बोलताना प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉक्टर अंजली उगिले मॅडम यांनी मुलींना शारीरिक आरोग्य जपण्यासंदर्भात सखोल असे मार्गदर्शन केले. मानसिक आरोग्य टिकवण्यासाठी शारीरिक दृष्ट्या निरोगी राहणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमासाठी उपस्थित अस-लेले डॉक्टर नेहा पाटील मॅडम यांनी या मशीनच्या वापरा संदर्भातले प्रात्यक्षिक मुलींना करून दाखवले व त्याची योग्य ती निगा राखण्यासाठी मार्गदर्शन केले. रोटीच्या सदस्या सौ. वर्षाराणी पाटील यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा देतच परीक्षेला सामोरे जाताना या विषयावर मार्गदर्शन केले.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. पाटील मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार श्री शिवाजी पाटील सर यांनी मांडले रोटेरियन डॉ.अंजली उगीले मॅडम, रो वृषाली चवळे, रो वर्षा पाटील , रो.डॉ.नेहा पाटील, संस्था सचिव सुषमा पाटील, रोटरी अध्यक्ष प्रा शिवशंकर , प्रोजेक्ट चेअरमन रो. कपिल बिरादार, रो.शिवाजी पाटील यांची उपस्थिती होती.

## दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती उत्साहात साजरी



अहमदपूर दि. २१ (प्रतिनिधी): येथील महात्मा फुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या वतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली .

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या मबाळशास्त्री जांभेकर जयंती कार्यक्रमाच्या म अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ . बब्रुवान मोरे हे होते तर कृतिका चिलगर ची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले .

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ .पांडुरंग चिलगर यांनी केले व आभार मनिषा सलगर ने मानले.

यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## संत ज्ञानेश्वर विद्यालयात शिवजयंती उत्साहात संपन्न

अहमदपूर दि. २१(कारामुंगीकर): संत ज्ञानेश्वर विद्यालयात शिवजयंती उत्साहात संपन्न झाली.



याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात १९ फेब्रुवारी २०२४ रोजी शिवजन्मोत्सव मोठ्या उत्सा-हात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका आशा रोडगे तर प्रमुख पाहुणे शिवव्याख्याते प्राध्यापक डॉक्टर सय्यद अकबर लाला हे उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचा विद्यालयाच्या वतीने येथोचित असा सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांचे शिवरायांच्या जी-वनावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली. शिवजन्मोत्सवानिमित्त विद्यालयात चित्रकला स्पर्धा, पोवाडा स्पर्धा गीत गायन स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या या स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे शिवव्याख्याते डॉक्टर सय्यद अकबर लाला यांचे शिवरायांच्या जीवनावरती प्रकाश टाकणारे व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका अशा रोडगे यांनी केले तर सूत्र संचलन सतीश साबणे यांनी केले तर आभार अश्विनी घोगरे यांनी मानले.

शेवटी पसायदान घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## सांगवीताडा येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



अहमदपूर दि. २०(कारामुंगीकर): सांगवीताडा येथे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर तालुक्यातील सांगवीतांडा येथील प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.या निमित्त शाळेत निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका महानंदा गोर-गे तर व्यासपीठावर विन-ोद गुंठे,नरसिंग सांगवीकर, रामचंद्र बाबळसरे,नागनाथ जवणे,विद्युलत्ता घोगरे,पंकज आडे,मनोज नरवटे,गणेश जाधव, विजयकुमार कोतवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी महानंदा गोरगे, नरसिंग सांगवीकर, नागनाथ जवणे, विद्युलत्ता घोगरे,स्वाती कदम, पंकज आडे,मनोज नरवटे, विजयकुमार कोतवाड व गणेश जाधव आदींनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व भावी आयुष्यास शुभेच्छा दिल्या. अनेक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून शिक्षक व शाळेप्रती भावना व्यक्त केल्या.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका स्वाती कदम तर सुत्रसंचालन विद्यार्थ्यांनी स्वाती बैकरे यांनी तर आभार विद्यार्थी सत्यनारायण राठोड या विद्यार्थ्यांने मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्ञानोबा व्हटमुर्गे, अक्षय फुले,केशव राठोड, सुदर्शन होळंबे, सचिन येचाळे, बबीता यादव, सुनिता राठोड, सुदर्शन होळंबे, सचिन येचाळे, बबीता यादव, आशा कानवटे आदींनी परीश्रम घेतले.

## जिल्हा स्काऊट गाईडच्या शोभा यात्रेमध्ये अहमदपूरच्या यशवंत विद्यालय याचे यश




अहमदपूर दि. २०(कारामुंगीकर): जिल्हा स्काऊट गाईडच्या शोभा यात्रेमध्ये अहमदपूरच्या यशवंत विद्यालय याने यश संपादन केले आहे.

याबाबत अधिक महिती अशी की, दि. १४.०२.२४ स्काऊट आणि गाईडच्या जिल्ह-ास्तरीय मेळावा चाकुर येथील साई नंदनवन येथे दि. १० फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी असे चार दिवसाच्या दरम्यान अत्यंत उत्साहाच्या वातावरणामध्ये जिल्हा मेळावा संपन्न झाला.

या मेळाव्यामध्ये यशवंत विद्यालयाच्या स्काऊट गाईड पथकाने शोभायात्रेमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना जिल्हा कार्यालयाच्या वतीने सर्व तृतीय पारितोषिक देण्यात आले.

या मुलांना स्काऊट गाईड चे प्रमुख नंदकुमार धनशेट्टे, संतोष पारशेटे, पुष्पाताई स्वामी, वर्षा राणी कांबळे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते.

या नेत्र दीपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ .अशोकराव सांगवीकर, सचिव दलितमित्र डी बी लोहारे गुरुजी, प्राचार्य गजानन शिंदे, उप मुख्याध्यापक राजकुमार गोटे, पर्यवेक्षक अशोक पेद्यवाड, राम तत्तापुरे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन आणि कौतुक केले आहे.

### सुविचार

**एक चांगला शिक्षक यशाचे दार उघडून देऊ शकतो. मात्र त्यातून यशाच्या दिशेने जाण्यासाठी विद्यार्थ्याला स्वत:लाच चालावे लागते.**

## नवोदय विद्यालयाच्या मराठी विषय कोड ००९ च्या प्रश्नपत्रिकेमध्ये काही प्रश्न सदोष आढळल्या बाबत निवेदन

अहमदपूर दि. २१(प्रतिनिधी): सीबीएससी बोर्ड नवोदयाच्या दिनांक २०.०२.२०२४ रोजी झालेल्या मराठी विषय कोड ००९ च्या प्रश्नपत्रिकेमध्ये काही प्रश्न सदोष असल्याचे आढळून आल्याबद्दल पालकाच्या वतिने क्षेत्रिय अधिकारी यांना निवेदन.

निवेदनात असे म्हटले आहे कि, १.प्रश्न क्र. ०३ (र) मधील खख - हा प्रश्न कर्मावर विचारलं गेला आहे. वास्तविक हा प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरचा आहे कारण अभ्यासक्रमामध्ये नाम व नामाचे तीन प्रकार, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण, शब्दयोगी अव्यय , उभयान्वयी अव्यय व केवलप्रयोगी अव्यय दिलेले आहे. कर्ता , कर्म अभ्यासक्रमाबाहेरचे आहे. २. प्रश्न क्र ०३ (र) मधील खखख - या मध्ये गटात न बसण-ारे वाक्य ओळखण्यास सांगितले गेलेले आहे परंतु, दिलेली वाक्ये गोंधळात टाकणारी आहेत कारण, शब्दयोगी अव्ययाचा विचार करता पर्याय अ हे वाक्य गटाबाहेरील आहे तर विशेषणाचा विचार करता पर्याय ड हे वाक्य गटाबाहेरील आहे म्हणजेच पर्याय अ आणि ड अशी दोन उत्तरे येतात म्हणजेच हा प्रश गोंधळात टाकणारा आहे.३. प्रश्न क्र ४ (र) मधील ळळ - वास्तविक हा प्रश्न लिंगविचारावरचा आहे परंतु, प्रत्यक्ष प्रश्नात लिंग वचनानुसार गटात न बसणारा शब्द ओळखण्यास सांगितले आहे. दिलेल्या पर्यायांपैकी लिंगाचा विचार करता पर्याय ड हे उत्तर येते तर वचनाचा विचार करता पर्याय अ हे उत्तर येते. म्हणजेच प्रश्न विचारण्याची पद्धतच सदोष आहे. ४.प्रश्न ४ (व) मधील ख - हा प्रश्न पूर्णपणे अभ्यासक्रमाबाहेरचा आहे कारण समास प्रकारच्या आधारे गटात न बसणारा शब्द ओळखण्यास सांगितलेले आहे मात्र दिलेल्या पर्यायापैकी पर्याय अ समाहार द्वंद्व, पर्याय ब हा उपमान उत्तरपद कर्मधाराय तत्पुरूष आणि पर्याय क नञ- बहुव्रीही समासची उदाहरणे आहेत . पर्यायब आणि पर्याय क अभ्यासक्रमाबाहेरील आहेत . २०२४ साठीच्या अभ्यास क्रमानुसार केवळ अव्ययीभाव, द्वंद्वचे ०३ प्रकार आणि द्विगु एवढेच समास अभ्यासासाठी असल्याने हा प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरील आहे. ५. प्रश्न क्र. ४(व) मधील ळळ-मधील उत्तराच्या योग्य पर्यायामध्ये मुद्रण दोष आहे. वास्तविक या प्रश्नाचे उत्तर अव्ययीभाव समास असे असायला हवे होते परंतु, असा विकल्पच दिलेला नाही तर पर्याय ब हा अव्ययीभाव समाहार असा दिलेला आहे. याचाच अर्थ हा प्रश्न सदोष आहे. ६.प्रश्न क्र ८(ल) मधील पहिले पत्र हे तक्रार पत्र असून किंवा मध्ये दिलेले दुसरे पत्र ही वास्तविक तक्रार पत्रच आहे. प्रश्नामध्ये केवळ मागणी करणारे पत्र लिहा असा उल्लेख केलेला असला तरी बसेस वेळेवर येत नसल्याचे तक्रारच आहे.

शिवाय, या मध्ये आ-गार व्यवस्थापक, पुणे यांना पत्र लिहा असा अर्धवट उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचा विचार करता स्वार-गेट आणि शिवाजीनगर अशी दोन आगारे आहेत. मग नेमके कोणाला पत्र लिहावे आणि विद्यार्थ्यांनी नेमका कोणता पत्ता लिहावा. दुसरी गोष्ट म्हणजे पुणे महानगर परिवहन मंडळाचा विचार करता पी. एम. टी. ची एकूण पंधरा आ-गारे आहेत. पैकी कोणत्या आ-गार व्यवस्थापकास पत्र लिहाव्यास हवे. सर्वात महत्वाचे म्हणजे पुणे शहाराबाहेरील संपूर्ण देशातील सर्व विद्यार्थ्यांना पुणे शहरातील एस. टी. महामंडळाच्या किंवा प. एम. टी. च्या आगारा विषयी माहिती कशी असू शकते?

महाशय या प्रश्नपत्रिकेमध्ये व्याकरण विभागातील प्रत्येकी एक गुणाचे पाच प्रश्न व लेखन विभागातील चार गुणांचा एक प्रश्न असे एकूण नऊ गुणांचे सहा प्रश्न सदोष आहेत. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा. ही विनंती पालकांच्या वतिने एका निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

## यशवंत विद्यालयात शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती विविध उपक्रमांनी साजरी



अहमदपूर दि. २०(कारामुंगीकर):यशवंत विद्यालयात शिवाजी महाराज यांची ३९४ वी जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी बोलताना प्राचार्य गजानन शिंदे शिवछत्रपती महाराजांचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य प्रा. मुजमिल सय्यद, उप मुख्याध्यापक राजकुमार घोटे, पर्यवेक्षक राम तत्तापुरे, डॉ. बालाजी कारामुंगीकर, डोंग्रज येथील उपक्रमशिल सेवानिवृत्त शिक्षक शिवाजीराव गायकवाड यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना शिंदे म्हणाले की, शालेय आणि महाविद्यालयीन युवकांनी मोबाईल, व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम यामध्ये व्यस्त न राहता अभ्यासासोबत, शिवछत्रपती महाराज यांच्या जीवन चरित्राचा चिकित्सकपणे अभ्यास केल्याने आपल्या जीवनाला सकारात्मक दिशा मिळते असे आग्रही प्रतिपादन प्राचार्य गजानन शिंदे यांनी केले.

प्रारंभी प्राचार्य गजानन शिंदे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राजकुमार घोटे, प्रा सय्यद एम.यू. यांची मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक पर्यवेक्षक राम तत्तापूरे यांनी सूत्रसंचालन के. डी. बिराजदार यांनी तर आभार राजकुमार पाटील यांनी मानले.

### चैतन्याचा झरा । शिवराय

शिवनेरीवर । जन्मले बाळ
अन्यायाचा काळ । शिवराय
माय जिजाबाई । प्रतिपाळ करी
गोष्टी सांगे भारी। पूर्वजांच्या
अराजक फार । पुंड शिरजोर
लूट बिनघोर । गरीबांची
सत्तेच्या नावाने । जबरी वसूली
अवकाळ आली । गावोगावी
लेकीबाळीवांचा । पाहुनिया छळ
जिजा घाली गळ । शिवबाला
मावळे घेऊन । फौज बनविली
आधी जिरवली । पेंढार्यांची
हल्ले किल्ल्यांवर । चढविले खास
एकच तो ध्यास । स्वराज्याचा
जीवाजी शिवाजी । मदारी मेहतर
खरे शिलेदार । शिवबाचे
हिरोजी फर्जंद । ताना नरवीर
बाजी धुरंधर । रणगाजी
स्त्री सन्मानाचा । हुकूम काढला
धाक बसविला । हिंमतीने
बाईच्या पदरा । झटला झोंबला
हातच छाटला । पाटलाचा
मराठी भाषेचा । घेऊन कैवार
केला कारभार । पारदर्शी
कोहिनूर हिरा । भारताचा खरा
चैतन्याचा झरा । शिवराय

**डॉ. मारोती कसाब**
महात्मा फुले महाविद्यालय,
अहमदपूर

### कबीरवाणी

**पढ़े गुनै सीखै सुनै**
**मिटी न संसै सूल।**
**कहै कबीर कासों कहूं**
**ये ही दु:ख का मूल ॥**

**भावार्थ :** संत कबीर म्हण-तात कि, रात्रंदिवस जागुन खूप अभ्यास केला. अनेक ग्रंथाचे, पुस्तकांचे वाचन केले. या जीवनामध्ये अन ेक चांगले विचार वाचले, ऐकले आत्मसात केले. अभ्यास करुन अनेक गोष्टी अध्ययनानंतर शिकता आल्या. तरीही जर मनात अनेक शंका, संशय निर्माण होतात. यावर संत कबीर म्हणतात मी कोणाकोणाला समजावून सांगू की, सगळ्या दु:खाचे मूळ हेच आहे. एवढे शिकून, ज्ञान संपादनकरुन, अभ्यास करून काय उपयोग, जो मनातील संशय, शंका दूर करू शकत नाहीत. शिक्षण हे शंका उत्पन्न करणारे नसावे ही शिकवण संत कबीरांनी दिली आहे.

**डॉ. बालाजी कारामुंगीकर**
**मो. ९८२३११२९०७**

यशवंत
धाराशिव जिल्हा
गुरूवार दि. २२ फेब्रुवारी २०२४

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

# कसबे तडवळेचे डॉ. आंबेडकर स्मारकासाठी शाळेच्या बांधकामासाठी निधी द्यावा - आ. पाटील




धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – तालुक्यातील कसबे तडवळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम पूर्ण होण्यासाठी जिल्हा परिषद शाळा स्थलांतरीत करण्यात यावी. तसेच त्याच्या उभारणीसाठी निधी द्यावा अशी मागणी आ. कैलास पाटील यांनी सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांची भेट घेऊन केली आहे. विशेष म्हणजे २०१५ पासुनचे संदर्भ पत्राद्वारे सरकारला दिले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळा येथे २२ व २३ फेब्रुवारी १९४१ रोजी महार – मांग वतनदार परिषद घेतली होती. त्यासाठी त्यांनी कसबे तडवळा येथे मुक्काम केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ वी जयंती वर्षे (दि.–१४ एप्रिल २०१५ ते दिनांक– १४ एप्रिल २०१६ हे समता व सामाजिक न्याय वर्षे म्हणून साजरे केले. त्यानुसार राज्यातील एकूण २८ ऐतिहासिक व सांस्कृतीक स्थळे व ठिकाणे निवड केली होती. त्यामध्ये कसबे तडवळे धाराशिव येथील सार्वजनिक वाचनालय, क्रांतीस्तंभ व इतर कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठी आयुक्तालयाकडून निधी वितरण करण्यात आला आहे. कसबे तडवळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने सार्वजनिक वाचनालय व क्रांतीस्तंभ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या जागेवर बांधण्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध नसल्यामुळे स्मारकाचे काम रखडलेले आहे. १२ ऑक्टबर २०२२ रोजी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण तथा जिल्हा प्रशासनातील इतर अधिकारी, गावकरी व सामाजिक कार्यकर्ते यांच्या समवेत कसबे तडवळे येथे बैठक झाली. या बैठकीमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अन्य ठिकाणी बांधून दिल्याशिवाय स्मारकाचे काम होणार नाही असे जिल्हाधिकाऱ्यांनी कळविलेआहे. सध्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील गट नंबर २२९ मधील ६ हजार चौ.मी. जागेवर बांधण्यासाठी १० कोटी ८६ लाख रुपये इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक व आराखडे सादर केले आहेत.

कृषी उत्पन्न बाजार समिती, धाराशिव च्या कार्यकारी मंडळाने २५ जुलै २०१९ रोजी ठराव केला. ही जागा शासकीय जमीन धोरणानुसार कृषी उत्पन्न बाजार समितीस भुसंपादनाच्या नुकसान भरपाईसह मावेजा घेऊन पणन संचालक यांच्या पुर्वपरवानगीने उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे. या जागेचे मुल्यांकन उप विभागीय अधिकारी, धाराशिव यांनी थेट वाटाघाटीने, थेट खरेदी भुसंपादन करण्याच्या नियमानुसार १ कोटी ९७ लाख रुपये मोबदला निश्चित केला. सामाजिक न्याय विभागाकडुन उपलब्ध होण्याच्या अधिन राहुन जागेचे आगाऊ ताबा देण्यासाठी प्रशासक कृषि उत्पन्न बाजार समिती धाराशिव यांना आदेश देणेबाबत जिल्हाधिकारी धाराशिव यांनी दि.३१ ऑक्टोबर २०२२ रोजी संचालक, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, पुणे यांना कळविले आहे. याबाबत सहकारी, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे सचिव यांना आदेशित करुन शाळेची इमारत बांधकामासाठी १२ कोटी ८३ लाख रुपये वितरीत करावेत अशी मागणी आ पाटील यांनी सचिवांकडे केली आहे.

# उर्वरित ६ मंडळातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी प्रयत्नशील - आ. पाटील

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – भारतीय कृषी विमा कंपनीने खरीप २०२२ मधील उर्वरित ५० टक्के नुकसान भरपाई रकमेतील रुपये २२६ कोटी आजवर शेतकऱ्यांना वितरित केले असून ६ कोटी रुपये वितरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तर शासनाकडील बाकी ५० कोटी रुपये पुढील आठवड्यात विमा कंपनीच्या खात्यावर जमा होणार आहेत. त्यामुळे उर्वरित ६ मंडळातील शेतकऱ्यांना महिना अखेरपर्यंत रक्कम मिळावी, यासाठी आपला प्रयत्न सुरू असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

खरीप २०२२ मध्ये चुकीच्या पद्धतीने ५० टक्के भारांकण लावून शेतकऱ्यांना विमा वितरित करण्यात आला होता. मात्र राज्य सरकारने खंबीर भूमिका घेतल्यानंतर विमा कंपनीने उर्वरित ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांना देण्याचे मान्य केले. विमा हप्त्यापोटी राज्य सरकारचे ५० कोटी रुपये विमा कंपनीला देणे बाकी असल्यामुळे विमा कंपनीने २८२ कोटी रुपये अनुज्ञेय नुकसान भरपाई रकमेतील २३२ कोटी रुपये तात्काळ वितरित करण्याचे तर शासनाकडून हप्त्याचे ५० कोटी रुपये मिळाल्यानंतर उर्वरित सहा मंडळातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई ची रक्कम वितरित करण्याचे मान्य केले होते. त्याअनुषंगाने आजवर रुपये २२६ कोटी वितरित करण्यात आले असून ६ कोटी वितरित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. तसेच भारतीय कृषी विमा कंपनीला रुपये ५० कोटी रुपये वितरित करण्याची फाईल वित्त विभागात अतिरिक्त मुख्य सचिवाकडे असून शेतकऱ्यांना लवकरात लवकर पैसे मिळावेत यासाठी या फाईलचा दैनंदिन पाठपुरावा सुरू आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात ती रक्कम विमा कंपनीला मिळणे अभिप्रेत असून ही रक्कम विमा कंपनीकडे



वर्ग होताच शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसान भरपाईची रक्कम वितरित करण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मोहा, पाडोळी (आ.), सावरगाव, सलगरा (दि.), अनाळा व सोनारी या ६ मंडळातील शेतकऱ्यांना ही रक्कम वितरित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

# युवकात आत्मविश्व निर्माण झाला पाहिजे - गायकवाड


कळंब दि.२१ (प्रतिनिधी) – आजची तरुणाई चुकीचा आदर्श घेऊन चालत आहे. आपणांसमोर छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आहे. परंतू आपण फक्त विचार ऐकतो. या विचारांचा अंगीकार केला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी युवकांनी शेती कशी करावी, उद्योग कसा करावा ? याविषयी आदर्श निर्माण केले आहेत. त्यांनी स्वराज्य निर्माण केले हे राज्य रयतेचे होते. शिवजयंतीच्या निमित्ताने शिवरायांच्या विचाराचा जागर व्हावा शिवजयंती नाचून नाही तर वाचून साजरी केली पाहिजे. प्रत्येकाच्या घरी पुस्तक असायला हवे शिवजयंती घराघरात व मनामनात असली असे आवाहन कळंब येथील तरुण शिवव्याख्याते प्रतीक गायकवाड यांनी शिव सेवा तालीम संघ शिवजयंती उत्सव समिती आयोजित व्याख्यान मालेमधील ६ वे पुष्प गुंफताना केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित व्याख्याते व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले त्यानंतर सई काळे या विद्यार्थिनीने जिजाऊ वंदना गायन केली. यावेळी शिवजयंती उत्सव



समितीचे मार्गदर्शक तथा कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे, प्रमुख पाहुणे बंडोपंत दशरथ, आनंद बलाई, राजेंद्र रुणवाल, नंदकिशोर मोरे, विठ्ठल माने, शिशिर राजमाने, अरेफ तांबोळी, महादेव खराटे, शाम खबाले, अतुल कवडे, सुभाष शिनगारे यांचा सत्कार शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजी कदम, गणेश भवर ,प्रताप शिंदे, सुरेश शिंदे ,गोविंद चौधरी, नामदेव पौळ, शिव खबाले, राजाभाऊ गरड, सचिन शिनगारे ,बालाजी कापसे, रोहित कापसे, मनोज कदम, यांनी केले या कार्यक्रमात उपस्थित माजी आमदार दयानंद गायकवाड व इंजि. प्रकाश धस यांनी युवा व्याख्याते प्रतिक गायकवाड यांचा सत्कार करून त्यांनी केलेल्या व्याख्यानाचे कौतुक केले यानंतर माजी आमदार दयानंद गायकवाड व इंजि. प्रकाश धस यांच्या शिवजयंती महोत्सव समितीच्यावतीने करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राचार्य महादेव गपाट व रमेश शिंदे यांनी केले.

# भारत पवार यांचे निधन



परंडा दि.२१ (प्रतिनिधी) – महावितरणचे सेवानिवृत्त कर्मचारी भारत भाऊराव पवार (वय ७३ वर्ष) यांचे ऱ्हदय विकाराच्या झटक्याने दि.२० फेब्रुवारी रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि.२१ रोजी सकाळी काशीमबाग रोड स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले .त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. ते भाजपा युवा मोर्चाचे परंडा शहर उपाध्यक्ष मनोहर पवार यांचे वडील होते.

# शिव जयंतीनिमित्त ऊसाच्या रसाचे वाटप



लोहारा दि.२१ (प्रतिनिधी) – शहरातील हॉटेल व्यावसायिक जब्बार मुल्ला यांच्यावतीने सामाजिक भावना जपत नागरिकांना मोफत ऊस रसाचे वाटप करुन छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी केली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष किशोर साठे, लोहारा तालुकाध्यक्ष सुनिल साळुंके, तहसिलदार काशीनाथ पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी माजी गटनेते अभिमान खराडे, उपनगराध्यक्ष आयुब शेख, नगरसेवक अमिन सुंबेकर, प्रशांत काळे, ओम पाटील, युवासेना शहरप्रमुख श्रीकांत भरारे, गौस मोमिन, जालिंदर कोकणे, हाजी शेख, आयुब शेख, प्रकाश भगत, महेश गोरे, प्रशांत थोरात, विक्रांत संगशेटी, भाजपा तालुका सरचिटणीस इकबाल मुल्ला, दगडू तिगाडे, उमेश देवकर, भागवत गायकवाड, दादा मुल्ला, खाशिम मुल्ला, आदम मुल्ला, यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# लोहगाव खंडाळा प्रकल्पातील दहन भूमी शेडचे बांधकाम थांबवावे

तुळजापूर दि.२१ (प्रतिनिधी) – तालुक्यातील हंगरगा( नळ) ग्रामपंचायतीकडून इंदिरा नगर तांड्यासाठी लोहगाव शिवारातील खंडाळा प्रकल्पालगत दहनभूमी शेडचे करण्यात येत असलेले बांधकाम त्वरित थांबवण्याची मागणी निवेदनाद्वारे लोहगाव ग्रामस्थ, शेतकरी व ग्रामपंचायतवतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

तुळजापूर तालुक्यातील हंगरगा( नळ) येथील ग्रामपंचायतीकडून इंदिरा नगर तांड्यासाठी लोहगाव शिवारातील खंडाळा प्रकल्पा लगत दहन भूमी शेडचे बांधकाम करण्यात येत आहे. परीणामी दहन भूमीत अंत्यविधी केल्यानंतर अस्थी प्रकल्पात विसर्जन केल्याने व पावसाळ्यात पावसाने वारे वादळाने अंत्यविधीची अस्थी प्रकल्पत व जलयोजनेच्या विहिरीतील पाण्यामध्ये मिसळून पिण्याचे पाणी दुषित होवून नागरिकांचे आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पातून लोहगाव, नंदगाव, रामतीर्थ, अलियाबाद, बोरगाव, शिंदगाव, रामनगर, योडोळा (तांडा) हंगरगा(नळ) या ८ ते १० गावांना जलयोजने मार्फत पाणी पुरवठा होतो.

यातील काही गावच्या जल योजनेच्या विहिरी आहेत. गावांना पिण्यासाठी पाणी पुरवठा होतो. असे असतानाही २ किलो मीटर अंतरावर असलेल्या इंदिरानगर तांड्यासाठी लोहगाव शिवारातील खंडाळा प्रकल्पात दहन भूमी शेड बांधण्यात येत असल्याने परिसरातील नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे. या दहन भूमी शेडचे बांधकाम तात्काळ थांबण्याची मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसिलदार तुळजापूर, गट विकास अधिकारी तुळजापूर यांच्याकडे केली आहे. या निवेदनावर शेतकऱ्यांच्या व ग्रामस्थांच्या सह्या आहेत. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ दखल घेवून दहन भूमीचे काम थांबवावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

# पीक विम्यापोटी डिपॉझिटसाठी शासनाकडून प्रतिज्ञापत्र सादर - जगताप

लोहारा दि.२१ (प्रतिनिधी) – खरीप २०२१ च्या पीक विमा संदर्भात छ संभाजीनगर उच्च न्यायालयात दि.२२ फेब्रुवारी रोजी महत्त्वपूर्ण सुनावणी होणार आहे. ३७४ कोटी रुपये डिपॉझिट करण्यासाठी शासनाकडून प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले असल्याची माहिती याचिकाकर्ते जगताप यांनी दिली आहे.

खरीप २०२१ मध्ये जिल्ह्यातील ६ लाख ६७ हजार ४८३ शेतकऱ्यांनी पीक विमा भरला होता. अतिवृष्टी सततचा पाऊस होऊनही पीक विमा कंपनीने केंद्रीय परिपत्रकाचा चुकीचा अर्थ लावून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना केवळ ५० टक्के इतकीच रक्कम दिली होती. यामध्ये ३७४ कोटी रुपये जमा केले होते. त्यामुळे उर्वरित ५० टक्के विमा रक्कम द्यावी. यासाठी सुरुवातीला जिल्हास्तरीय समितीने व नंतर विभागीय आयुक्ताने शेतकऱ्यांना उर्वरित ३७४ कोटी रुपये देण्याचे आदेश विमा कंपनीला दिले होते. परंतू या आदेशाची अंमलबजावणी न करता विम्याची रक्कम शेतकऱ्यांना देत नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन पीक विमा कंपनीला ताळ्यावर आणण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी महसुली कारवाई सुरू केली होती. मात्र त्याला पीक विमा कंपनीने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने त्यांना कुठलीही रक्कम भरून न घेता स्थगिती दिली होती. या सर्व प्रक्रियेला एक वर्ष



होऊनही काहीच हालचाल होत नव्हती म्हणून याचिका कर्ते अनिल जगताप यांनी राज्य शासनाकडे प्रतिज्ञापत्र सादर करून कंपनीकडून ३७४ कोटी रुपये भरुन घ्यावे व शेतकर्यांना वाटप करावे, असा आग्रह धरला होता. त्यानुसार शासनाने उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले असून उद्या या प्रकरणाची सुनावणी होणार असून या सुनावणी कडे शेतकऱ्यांसह सर्वांचे लक्ष लागले आहे.

# २३ फेब्रुवारी ते ५ मार्च अनाथ पंधरवडा

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – जिल्ह्यात अनाथ बालकांसाठी २३ फेब्रुवारी ते ५ मार्च या कालावधीमध्ये अनाथ पंधरवडा साजरा करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, कक्ष क्र.१० धाराशिव येथे समर्पित कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील अनाथ बालकांनी या कालावधीमध्ये आधार कार्ड,रेशन कार्ड, जातीचा दाखला, अधिवास व राष्ट्रीयत्वाचा दाखला व मतदान कार्ड आदी काढण्यासाठी समर्पित कक्षातील अमोल कोवे (९५९५६५४८२३) व जयश्री भाले (९७६३२३९०६७) यांच्याशी संपर्क करावा. जिल्ह्यातील सर्व अनाथ बालकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, जातीचा दाखला, अधिवास व राष्ट्रीयत्वाचा दाखला व मतदान कार्ड काढून घेण्यात यावे. तसेच याबाबत जनतेने, सामाजिक कार्यकर्ते, स्वंयसेवी संस्था यांनीही आपल्या परिसरातील, गावातील जास्तीत जास्त अनाथ बालकांना व त्यांच्या नातेवाईकांना या अनाथ पंधरवड्याची माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुनील अंकुश यांनी केले आहे.

# धाराशिवकरांनी अनुभवला शिवरायांचा धगधगता इतिहास

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) – सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्तवतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत शिवगर्जना या महानाट्याचे आयोजन धाराशिव येथे १८, १९ व २० फेब्रुवारी रोजी श्री तुळजाभवानी जिल्हा क्रीडा संकुलात सायंकाळी ६.३० ते ९.३० वाजता दरम्यान सादर करण्यात आले.

शिवराज्यभिषेकाच्या ३५० व्या वर्षानिमित्त हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवन कार्य बघण्याचा योग समस्त धाराशिवकरांना शिवगर्जना महानाट्याच्या माध्यमातून याची देही याची डोळा आला. महानाट्यातील कलाकारांचे उत्कृष्ट सादरीकरण, उत्तम वेशभूषा, सुसंगत प्रकाश योजना व सजावट तसेच उपस्थित रसिकांकडून महानाट्याला मिळणारा टाळ्यांचा प्रतिसाद आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय या जयघोषाने क्रीडा संकुलाचे वातावरण शिवमय झाले होते.

शिवगर्जना या महानाट्यात छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका विनायक चौगुले या कलाकाराने अतिशय उत्तमपणे साकारली. माँ जिजाऊंची भूमिका दिपाली हांडे, बाल शिवाजीच्या भूमिकेत सुरज कोळी, शहाजी राजांच्या भूमिकेत सुहास चौगुले तर अफजल खानाची भूमिका शकील पटेल यांनी अतिशय सुरेख साकारली आहे.

१८ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांच्या हस्ते शिवगर्जना या महानाट्याचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी शिवाजी शिंदे, उपविभागीय अधिकारी संजय ढवळे, तहसीलदार प्रवीण पांडे, काकडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वृषाली तेल्लोरे, साहित्यिक युवराज नळे, शिवगर्जना महानाट्याचे दिग्दर्शक स्वप्नील यादव व निर्मात्या रेणू यादव आदी उपस्थित होते. तर १९ फेब्रुवारी रोजी निवासी उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपविभागीय अधिकारी संजय ढवळे, साहित्यिक युवराज नळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वृषाली तेल्लोरे, साहित्यिक युवराज नळे, शिवगर्जना या महानाट्याचे दिग्दर्शक स्वप्नील यादव, निर्मात्या रेणू यादव आदी उपस्थित होते. तसेच २० फेब्रुवारी रोजी महसूल उपजिल्हाधिकारी संतोष भोर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिरीष यादव, जिल्हा ग्राहक मंचचे सस्ते, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वृषाली तेल्लोरे, साहित्यिक युवराज नळे, शिवगर्जना महानाट्याचे दिग्दर्शक स्वप्नील यादव, निर्मात्या रेणू यादव आदी उपस्थित होते. मागील तीन दिवसांत समस्त धाराशिवकरांनी



छत्रपती शिवाजी महाराजांचा धगधगता इतिहास अनुभवला. प्रचंड प्रतिसादात या महानाट्याचा २० फेब्रुवारी रोजी समारोप करण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराजांनी जगामध्ये स्वराज्याचा आदर्श निर्माण केला: शिवाजीराव पाटील कव्हेकर



लातूर/ प्रतिनिधी- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्माच्यावेळी मोगल, कुतूबशहा, आदिलशहाची जुलमी, अत्याचारी, व्यभिचारी हुकूमशाही होती. भारतावरती शेकडो वर्ष ते राज्य करीत होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजी राजे प्रधान म्हणून आदिलशहाकडे होते. या परिस्थितीत राजमाता जिजाऊंच्या आध्यात्मिक, हुकुमशाही अन्यायकारी कृती विरोधी विचारामुळे शिवाजी महाराजांना रायरेश्वरांच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची शपथ वयाच्या १६ व्या वर्षी घेतली. राजे यांनी स्वराज्याच्या माध्यमातून जनतेचा सर्वांगिण विकास, त्यांचा सन्मान, आपलेपणा, महिला भगिणींचे पावित्र्य जपण्याचा व अन्यायाचा बिमोड करण्याचे ऐतिहासिक कार्य जाणता राजा छत्रपती शिवाजी राजांनी केले. आणि जगामध्ये स्वराज्याचा आदर्श निर्माण केला असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद नॅशनल स्कूल, छत्रपती संभाजीनगर येथे शिवजयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला प्राचार्य हरिणी चित्रा, उपप्राचार्य मनोहर धनेधर, पर्यवेक्षक भरत कुमार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांची रयतेच्या प्रती असलेली सामाजिक बांधिलकी त्यांच्या कुशल नेतृत्वाच्या माध्यमातून समोर आलेली आहे. त्यांनी समाजातील अठरापगड जातींना सोबत घेऊन रयतेचे राज्य निर्माण केले. त्यांनी निर्माण केलेल्या या सुराज्यामध्ये सर्वांना सन्मान, स्त्रियांना आदराची वागणूक देऊन स्वराज्याची उभारणी केली आणि ६ जून १६७४ ला शिवराज्याभिषेक करून सर्वांना खर्‍या स्वराज्याचा आदर्श दाखवून देण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे छत्रपती शिवारायांचे विचार आत्मसात करून त्या विचारावर वाटचाल करा असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य मनोहर धनेधर यांनी केले तर कार्यक्रमाची सुत्रसंचलन व आभार पर्यवेक्षक भरत कुमार यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचार्‍यासह पालक व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शिवबांचे विचार शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविले पाहिजे : प्राचार्य डॉ. गव्हाणे

लातूर (प्रतिनिधी)- राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाच्या वतीने दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करुन त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे हे होते. या प्रसंगी महापुरुषांच्या जयंती निमित्त फक्त पुजा-अर्चा करुन त्यांना देव बनवण्यापेक्षा त्यांचे विचार समाजासमोर मांडले पाहिजे. शिवाजी महाराजांनी जाती धर्माच्या नावाखाली पुजा अर्चा केली असती तर स्वराज्याची निर्मिती झाली नसती. शिवरायांच्या मूर्तीला दुग्धाभिषेक करण्यापेक्षा माणसाच्या हृदयात शिवरायांचे विचार असले पाहिजे. डीजे लाऊन नाचण्यापेक्षा अन्यायाविरुद्ध आवाज उठविले पाहिजे. त्यासाठी शिवबांचे विचार शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविले पाहिजे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. महादेव गव्हासणे यांनी केले.

यावेळी माजी मंत्री व आमदार मा. संभाजी पाटील निलंगेकर,



अतिरिक्त जिल्हाधिकारी मा. श्री. सूनिल यादव, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. ओमप्रकाश शहापूर, डॉ. दिपक वेदपाठक, डॉ. अभिजित यादव, ग्रंथपाल प्रा. एस.बी. मस्के, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, डॉ. संभाजी पाटील, डॉ. अनिरुद्ध जाधव, प्रा. दत्तात्रय सोनकांबळे, प्रा. ज्ञानेश्वर राठोड, डॉ. दयानंद राजे, प्रा. शुभम जाधव, श्री गोविंद जाधव, महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमात उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांनी ही मार्गदर्शन केले. ते म्हणाले की जगाला काबीज करण्यासाठी शौर्य मनात असावे लागते. शिवबांनी जाती धर्माचे भेद न करता अठरा पगड जातींना एका शिवसुत्रात बांधुन ठेवले व गणिमी काव्याने मुठभर सैन्याच्या जोरावर लाखो सैन्य असलेल्या जुल्मी सत्तेला उलथून टाकले. शिवरायांचे राज्य सर्वांना हवेहवेसे वाटते. म्हणून शिवरायांचे विचार आज आत्मसात करण्याची गरज आहेफ्फ़ असे प्रतिपादन केले. यावेळी प्रतिक आवाड व अजम पठाण या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्याण सावंत यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. विजय गवळी यांनी केले.

# विश्व पब्लिक स्कूल येथे शिवजन्मोत्सव सोहळा व स्नेहसंमेलन हर्षोल्लासात संपन्न



देगलूर(प्रतिनीधी): छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून विश्व पब्लिक स्कूल, देगलूर येथे शिवजन्मोत्सव सोहळा व वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम अत्यंत हर्षोल्लासात साजरा करण्यात आला. शाळेतील बाळगोपाळांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्रावरील पोवाडा व विविध संस्कृतीचे दर्शन घडवणारे नृत्य सादर करून विविध कलागुणांचे सादरीकरण केले.

विश्व पब्लिक स्कूलमधील बाळ गोपाळांचे कौतुक करण्यासाठी पोलीस उपअधीक्षक संकेत गोसावी, पोलीस निरीक्षक विश्वनाथ झुंजारे, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, शिक्षणतज्ज्ञ एच.एस. खंडागळे , आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार सुरेशदादा गायकवाड, नांदेड येथील ज्येष्ठ उद्योजक अनिल शेटकार, महेश पाटील आल्लापूरकर, दीपकभाऊ कांबळे रामपूरकर,गजानन भोसले, डॉ. शोभा भूमे , माजी जि.प. सदस्य आश्विनीताई पाटील गोजेगावकर, माजी नगरसेविका गंदपवार , ताराकांत पाटील नरंगलकर, घाळप्पा अंबेसंगे, बस्वराज पाटील वन्नाळीकर, एडवोकेट अशोक लच्छनकर, माजी नगरसेवक शैलेशभाऊ उल्लेवार, नितेश पाटील, माजी नगरसेवक लालू कोयलावार, माधवराव फुलारी, डॉ. सुनील जाधव, अंबादास पाटील नरंगलकर, गजानन पाटील मुजळगेकर, बालाजी पाटील थोटवाडीकर, खालिद पटेल, अशोकभाऊ कांबळे, राजाभाऊ कांबळे, ग्रामसेवक संघटनेचे सुरेश चप्पलवार, पत्रकार संतोष मनधरणे, शहाजी वरखिंडे, श्याम वद्देवार, शिक्षक संघटनेचे बसवंत हाळदे, चंद्रशेखर लगडे, वैजनाथ मिसे, लक्ष्मण मुंगडे सर, रमेश सोनकांबळे शिवणीकर, प्रशांत पाटील, पांडू पाटील सोमूरकर, विष्णूकांत पाटील शेकापूरकर, बालाजी हत्ते, डॉ. मिलिंद शिकारे, एकनाथराव टेकाळे, रमेशजी घुळेकर यांच्यासह अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. तसेच मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी मंडळी उपस्थित होती.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते बासरी वादनात राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक मिळवलेली विद्यार्थिनी राधिका सुवर्णकार व तिचे गुरु ऐन्नोद्दीन वारसी यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याच बरोबर देगलूर तालुक्यातील नव्याने निवड झालेल्या अभ्यासू व तरुण पोलीस पाटलांचा सुद्धा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालिका आम्रपाली येसगे व प्रास्ताविक कैलास येसगे कावळगावकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षिका व पालकांनी विशेष मेहनत घेतली.

# शिवचरित्र हे कृती व आचरणात आणावयाचे चरित्र :प्राचार्य कुलकर्णी

देगलूर (प्रतिनिधी) : छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर अखिल भारताचे एक महत्त्वपूर्ण आराध्य दैवत असून जागतिक राजकारणालाही दिशादर्शक ठरणारे असे ते चरित्र आहे, अर्थात शिवचरित्र हे कृती व आचरणात आणावयाचे चरित्र आहे असे मत प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले. वैकुंठवासी धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभागाच्या संयुक्त विद्यमाने १९ फेब्रुवारी २४ रोजी शिवजयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. छत्रपती शिवरायांच्या प्रतिमा पूजनाने या कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. दिलीप भडके, प्रा. विठ्ठल जाधव, डॉ. गणपत कारीकंटे, रा.से.यो. समन्वयक प्रा. सतिश जांभळीकर, प्रा. अनिल ठोसरे, डॉ. भास्कर कोशीडगेवार यांची प्रमुख उपस्थिती होती पुढे बोलताना



प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी म्हणाले की, शिवकालीन राजकारणातील कल्याणकारी तत्त्वाचा व जनहिताचा विसर पडल्यामुळेच आज राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्रात विविध समस्या भेडसावत आहेत. या समस्यांचे निराकरण हे शिवचरित्रातील आदर्श तत्वाच्या अंमलबजावणी द्वारेच होऊ शकेल असा विश्वासही प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिगंबर कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. गंगाधर देशमुख यांनी केले तर आभार प्रा. विवेक ठावरे यांनी मानले. सदरील कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# ॲड.विनोद निला यांना
## व्हॉईस ऑफ मीडियाचा राज्य पुरस्कार

लातूर:व्हॉईस ऑफ मीडिया राज्यस्तरीय उत्कृष्ट तालुकाध्यक्ष अवॉर्ड मराठवाड्यातुन चाकूर तालुकाध्यक्ष ॲड.विनोद गणपतराव निला यांना जाहीर करण्यात आला आहे.सदरील पुरस्काराचे मुंबई येथे वाय.बी चव्हाण सेंटर मुंबई येथे २६ फेब्रुवारी२०२४ रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत वितरण होणार आहे.

व्हॉईस ऑफ मीडियाचे सन २०२३चे राज्य उत्कृष्ट पदाधिकारी अवॉर्ड,पॉझिटिव्ह जनालिझम अवॉर्ड,महाराष्ट्र भूषण अवॉर्ड जाहीर करण्यात आले आहेत. राज्य उत्कृष्ट पदाधिकारी अवॉर्ड मराठवाड्यातुन लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुकाध्यक्ष ॲड.विनोद गणपतराव निला यांना जाहीर करण्यात आला आहे.यावेळी प्रत्येक विभागातून दोन सर्वोत्कृष्ट काम करणार्‍या तालुक्यांना व्हॉईस ऑफ मीडिया सर्वोत्कृष्ट तालुका २०२३ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर राज्यातून एका विभागाला, एका जिल्ह्याला. आणि एका शहरालाही, व्हॉईस ऑफ मीडिया सर्वोत्कृष्ट २०२३ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे.सदरील पुरस्काराचे वितरण मुंबई येथे वाय.बी चव्हाण सेंटर येथे



२६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४.०० वा.विविध खात्याचे मंत्री, सामाजिक मान्यवर, मंत्रालयीन सचिव आदीं मान्यवरांच्या उपस्थिती होणार आहे.या निवडीबद्दल ॲड. विनोद निला यांचे, मराठवाडा अध्यक्ष विजय चोराडीया, जिल्हाध्यक्ष संगम कोटलवार, विभागीय संघटक बालाजी फड, जिल्हा कार्याध्यक्ष शहाजी पवार,तालुका कार्याध्यक्ष प्रशांत शेटे, सरचिटणीस संग्राम वाघमारे, सुधाकर हेमनर , पदाधिकारी आदिनी अभिनंदन केले आहे.

**परिक्षार्थींचे पुष्पहार आणि गूलाब पुष्प देवून स्वागत**

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात बारावी बोर्ड परीक्षा सुरळीत सुरू

लातूर / प्रतिनिधी- महात्मा बसवेश्ववर महाविद्यालय, लातूर येथे बारावी बोर्ड परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२४ सुरळीतपणे सुरू झालेली आहे.

आज या परीक्षेचा पहिला दिवस असल्याने महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर आलेले पालक आणि परीक्षार्थी यांचे महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, केंद्र संचालक उपप्राचार्य प्रा. संजय पवार, सहकेंद्र संचालक पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे आणि कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी पुष्पहार आणि गूलाब पुष्प देऊन स्वागत केले.

लातूर विभागीय मंडळाचे सचिव तथा अध्यक्ष सुधाकर तेलंग यांच्या मार्गदर्शनाखाली आज या परीक्षेचा प्रारंभ झाला आहे. या परीक्षा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांच्या देखरेखेखाली संपन्न होत असून केंद्र संचालक म्हणून उपप्राचार्य प्रा. संजय पवार आणि उपकेंद्र संचालक म्हणून पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे हे परीक्षेचे काम बघत आहेत. या परीक्षेसाठी प्रा. खपाटे एस. के. व प्रा. लवटे पि. डी. हे रनर म्हणून कार्य करीत आहे. त्यांचा श्री महात्मा महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे, संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे आणि अशोकप्पा उपासे यांच्या हस्ते सत्कार केला.

# बारावी बोर्डाच्या परीक्षार्थींना पुष्पगुच्छ व लेखनी देऊन स्वागत



शिरूरआनंतपाळ : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाचे लातूर जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. बापुसाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिरूर अनंतपाळ शहरातील श्री अनंतपाळ नुतन विद्यालयात इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेच्या १९० विद्यार्थी व शिक्षक यांना परिक्षेच्या पहिल्या दिवशी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव महादेव आवाळे यांच्या संकल्पनेतून डॉ बापुसाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ व लेखनी देऊन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व होऊ घातलेल्या परिक्षेत जास्तीत जास्त गुण घेऊन उत्तीर्ण होवो अश्या शुभेच्छा दिल्या या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष संदिप धुमाळे, काँग्रेस पक्षाचे युवा पदाधिकारी मुसा मुजेवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी धोडिंराम लासूणे, विशाल गिलचे, अविनाश पानगावे,सुरज आवाळे,खुदबोदिन चौधरी, सुचित लासुने या वेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी मादलापुरे,प्रा.पडिले सर,प्रा.पौळकर सर तसेच शिक्षक व पदाधिकारी उपस्थित होते.

# काल्याच्या कीर्तनाच्या वेळी जनसागर उसळला

लातूर / प्रतिनिधी- वारकरी संप्रदायाच्या नियमानुसार कथा, अखंड हरिनाम सप्ताहा नंतर काल्याचे कीर्तन होत असते .श्री श्री अष्टोत्तर शत कुंडात्मक अतिरुद्र महायाग एवं श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञाची काल सांगता झाली असली तरी बाबांच्या काल्याच्या कीर्तनाने या सत्संगाची खर्‍या अर्थाने सांगता आज झाली असे म्हणावे लागेल .यावेळी कथा मंडपात जनसागर उसळला होता यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

लातूर नगरीतील राजीव गांधी चौकातील पंचमुखी हनुमान मंदिर परिसरात पाच एकर जागेमध्ये उभा करण्यात आलेल्या भव्य कथा मंडपामध्ये आज पूजनीय बाबांचे काल्याचे कीर्तन झाले .यावेळी अलोट गर्दी उसळली होती .यावेळी श्री श्री राधाकृष्ण सत्संग समितीच्या वतीने बाबांचा यथोचित सत्कार करण्यात आला. समितीचे अध्यक्ष हरिप्रसाद मंत्री, सचिव संजय बोरा ,तसेच नाथसिंह देशमुख ,राजेश्वर बुके ,चंद्रकांत बिराजदार ,अँड. प्रदीप मोरे ,मनीष आकनगिरे आदींनी बाबांचा पुष्पहार घालून सत्कार केला .

यावेळी बाबांनी याल तरी यारे यारे.. अवघे माझ्या मागे मागे,..आधी देतो पोटभरी पुरे म्हणाल तोवरी हळू हळू चला.. कोणी कोणाशी न बोला आधी देतो पोटभरी पुरे म्हणाल तोवरी या तुकाराम महाराजांचा अभंग घेत पूजनीय विद्यानंदजी सागर बाबा यांनी काल्याचे कीर्तन केले. अत्यंत मांगल्यपूर्ण वातावरणात अष्टोत्तर शत कुंडात्मक अतिरुद्र महायाग आणि श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाची सांगता झाल्यानंतर ज्याप्रमाणे कथेला दिवसागणिक गर्दी उसळली होती ;तशीच गर्दी बाबांच्या आजच्या काल्याच्या कीर्तनाला देखील उसळली होती . यामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

संत तुकाराम महाराज यांनी ४०० वर्षांपूर्वी लिहिलेल्या या अभंगाची सत्यता आजही आपल्याला पाहावयास मिळते .आपण धन कमावण्याच्या मागे लागून धर्माला विसरत चाललेलो आहोत धन जरूर कमवा; परंतु एका विशिष्ट कालावधी पर्यंत आपण थांबायला हवे .धन कमवता कमवता आपण भौतिकतेला ,वासनेला बळी पडत चाललेला आहोत कोणाला पोटाची भूक आहे तर ,कोणाला धनाची भूक आहे, तर कोणाला वासनेची भूक आहे. धन कितीही कमवले , तरी आपण असंतुष्ट राहतो. विशिष्ट कालावधीत मध्ये आपण समाधानी राहायला शिकले पाहिजे .संसारामध्ये जास्त काळ रमायचे की पारमार्थिक सुख घ्यायचे हे आपण सुरुवातीला ठरवायला हवे. परमार्थामध्ये शुद्ध -सात्विक तत्त्वज्ञान दिलेले आहे. आणि पारमार्थ मधून खर्‍या अर्थाने आपल्याला आनंद मिळतो. हा आनंद आत्मिक असतो. भजन करणे ही आत्म सुखाची एक प्रमुख स्थिती असते; परंतु आपण धर्माच्या नावाने ,कथेच्या नावाने, कीर्तनाच्या नावाने व्यापार मांडलेला आहे. धर्माची दुकानदारी आपण चालवली आहे. धर्माचा व्यापार आपण बनवून टाकलेला आहे. पाखंडी माणसांनी धर्माचा बाजार केल्यामुळे धर्मक्षेत्रामध्ये काही गैरप्रकार निर्माण झालेले आहेत. भजनामध्ये ,कीर्तनामध्ये, कथेमध्ये आपण दुकानदारी चालवलेली आहे. हा भाग वेगळा असला तरी ज्ञान हे विकण्याचे साधन नाही. धार्मिक बनायचे असेल तर बाह्य रंगाचे वस्त्र टाकून द्या .भक्ती तुम्हाला करायची असेल तर पाखंड, ढोंग याचा त्याग करा .अध्यात्माचा बाजार म्हणून आपण परमार्थ करायला लागलो तर ते चुकीचे आहे. विद्वान तुम्हाला बनायचे असेल तर ज्ञानोबा तुकोबा रायासारखे विद्वान बना , धर्माचे पालन करायचे असेल तर पाखंडाचा त्याग करावा लागेल ,असा हितोपदेशही बाबांनी काल्याच्या कीर्तनामध्ये केला.

या देशाला गणवेशाची गरज नाही तर गुणवेशाची गरज आहे. संत बनण्यासाठी आपण प्रयत्न करतो परंतु चांगला माणूस बनण्यासाठी प्रयत्न करीत नाही. चांगला माणूस बनण्यासाठी गणवेशाची नव्हे तर गुणवेशाची गरज धर्म. हे बळजबरीने करण्याची गोष्ट नाही. प्रसन्नतेसाठी ,आत्मिक आनंद मिळण्यासाठी धर्म करा. अध्यात्म हे ध्येय असेल तर तुम्हाला योग्य रस्ता सापडेल.



याप्रसंगी बाबांनी म्हटलेल्या विठ्ठल माझा माझा माझा मी विठ्ठलाचा.. या भजनावर उपस्थित मंडपातील साधू- संतांसह, स्त्री-पुरुष भाविकांनी नृत्याचा फेर धरला बाबांना देखील या नृत्यांमध्ये सहभागी होण्याचा मोह आवरता आला नाही. यावेळी असंख्य स्त्री-पुरुष भाविकांनी त्याचा आनंद लुटत भक्ती सागरात डुबून जाण्याचा अनुभव घेतला. लातूरचे खासदार सुधाकर शृंगारे यांनी पूजनीय बाबांचे कथास्थळी येऊन दर्शन घेतले. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दुर्गाप्रसाद मोटे यांनी केले.

# महेश विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी



उदगीर (प्रतिनिधी) महेश प्राथमिक विद्याम ंदिर उदगीर ,येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली, त्यानिमित्त घेण्यात आलेल्या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिभाताई बिराजदार म ॅडम ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या अध्यक्षामा.प्रा.कवयित्री श्रीमती. मंगलताई शेटे मॅडम, संस्थेचे सचिव श्रीमान प्रवीण बिरादार साहेब व जिल्हा परिषद प्रशाला( वाढवणा) च्या मुख्याध्यापिका श्रीमती. सुनंदाताई सरदार या होत्या.

या कार्यक्रमात वर्ग पहिलीतील बाल चिमुकल्यांनी सुंदर अशी भाषणे केली व जाण- ता राजाङ्क छत्रपती शिवाजी महाराजङ्क यांच्या जीवनावर आधारित सुंदर असे नृत्य सादर केले ,हा कार्यक्रम पाहण्यासाठी पालक वर्ग म ोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती. सुनंदा सरदार मॅडम यांनी वर्ग पहिलीतील बाल चिमुकल्याणी सुंदर असे सादरीकरण केले त्याबद्दल माझे मन भरून आले असे मत व्यक्त करून सर्वांना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती. मंगलताई शेटे मॅडम यांनी शिवरायांच्या जीवनावर आधारित स्वरचित अशी कविता सादर केली तर अध्यक्षीय समारोप- ात शाळेच्या मु.अ. सौ. प्रतिभाताई बिरादार मॅडम यांनी विद्यार्थ्यांना थोर नेत्यांचे विचार अंगी बाळगावे असा मोलाचा सल्ला देऊन वर्ग पहिलीच्या बाल चिमुकल्यांनी सुंदर असे कार्यक्रमाचे नियोजन केल्याबद्दल सर्वांचे तोंड भरून कौतुक केले .या कार्यक्रमाचे उत्कृष्ट असे सूत्रसंचलन वर्ग पहिलीतील कु. शेटकार रुद्रानि बालाजी हिने केले, आणि सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन वर्ग शिक्षिका सौ.पाटील जे.डी. मॅडम यांचे लाभले, हा कार्यक्रम उत्कृष्टरित्या सादर केल्याबद्दल संस्थेचे संस्थापक श्री. टी.व्ही. बिरादार साहेब, संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. अशोक देवंगरे साहेब व संस्थेच्या सदस्या,प्राचार्य सौ .शोभाताई कल्याणी मॅडम व उपस्थित सर्व पालकांनी सर्वांचे कौतुक केले आहे.

# यशवंत वसतिगृहाचे वार्षिक स्नेहसंमेलन



उदगीर (प्रतिनिधी) तालुक्यातील एकुर्का रोड येथील शासन मान्य मागासवर्गीय मुलांचे यशवंत वसतिगृह येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

या वेळी संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, सदस्य सिद्धार्थ बोडके, प्रा. एम. व्ही. स्वामी, अधिक्षक सचिन श्री- गीरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस गाण्यांवर बहारदार नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सम ाजप्रबोधनात्मक नाट्य ही सादर केले. यासाठी वसतिगृह कर्मचारी म ोहन घुळे, हाणमंत घुळे, आशाताई कांबळे, महानंदा जाधव यांनी पुढाकार घेतला.






## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६/२०२४ निशाणीक्रमांक०६

ज्याअर्थी नामे Gurubas Madhavrao Bhendegave हे दिनांक ०१.०६.२०१९ रोजी At. Latur & Shivraj Gurubas Bhandegave हे दिनांक ०२.०९.२०२० रोजी At.Thane येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Ashok S/o Gurubas Bhendegave, age 65 yrs, occu. labour, R/o Nagalgaon, Tq. Udgir, Dist. Latur. At present R/o Panchwati Nagar, Latur, Dist. Latur.
2) Parvati W/o Madhav Bhandekari, age 62 yrs, occu. H.H., R/o Panchincholi, Dist. Latur.
3) Bharatbai W/o Amarnath Mhetre, age 59 yrs, occu. H.H., R/o Nagalgaon, Tq. Udgir,, Dist. Latur.
4) Balika W/o Udhav Deshmane, age 45 yrs, occu. H.H., R/o Nagalgaon, Tq. Udgir, Dist. Latur.
5) Rajeshree W/o Shivraj Bhendegave, age 57 yrs, occu. H.H., R/o Nagalgaon, Tq. Udgir, Dist. Latur. At present R/o Baliram Nagar, Thane.
6) Rahul Kumar S/o Shivraj Bhendegave, age 37 yrs, occu. service, R/o Nagalgaon, Tq. Udgir, Dist. Latur. At present R/o Kolkatta West Bengal.
7) Avinash S/o Shivraj Bhendegave, age 34 yrs, occu. labour, R/o Nagalgaon, Tq. Udgir, Dist. Latur. At present R/o Baliram Nagar, Thane.
8) Shridevi W/o Gangaram Lokhande, age 33 yrs, occu. H.H., R/o Nagalgaon, Tq. Udgir, Dist. latur. At present R/o Bori, Dist. Latur.

यांनी खालील नमूद ८ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Ashok S/o Gurubas Bhendegave | 65 | Son |
| 2) Parvati W/o Madhav Bhandekari | 62 | Daughter |
| 3) Bharatbai W/o Amarnath Mhetre | 59 | Daughter |
| 4) Balika W/o Udhav Deshmane | 45 | Daughter |
| 5) Rajeshree W/o Shivraj Bhendegave | 57 | Daughter in law |
| 6) Rahul Kumar S/o Shivraj Bhendegave | 37 | Grandson |
| 7) Avinash S/o Shivraj Bhendegave | 34 | Grandson |
| 8) Shridevi W/o Gangaram Lokhande | 33 | Grand Daughter |

अर्जदार याने Gurubas Madhavrao Bhendegave & Shivraj Gurubas Bhandegave या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Gurubas Madhavrao Bhendegave & Shivraj Gurubas Bhandegave यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः ०९/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २८/०२/२०२४

आदेशावरुन

(संतोष डि.शिंदे) कनिष्ठ लिपिक सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## जाहीरनामा

जा.क्र.२०२३/एमएजी/कावि दि. ०८/०२/२०२४

ज्याअर्थी अर्जदार तानाजी त्रिंबकराव बिरादार रा. मल्लापूर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०३/०४/१९६७ रोजी मौजे मल्लापूर ता.उदगीर येथे झाला असून जन्म-मृत्यु नोंदवहीला जन्म नोंद करण्यात आलेली नाही. सदरीलतानाजी त्रिंबकराव बिरादार रा. मल्लापूर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०३/०४/१९६७ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दिनांक ०३/०४/१९६७ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हनणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू अर्जदार तानाजी त्रिंबकराव बिरादार रा. मल्लापूर ता.उदगीर यांचा जन्म दिनांक ०३/०४/१९६७ रोजी नोंद ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय मल्लापूर ता.उदगीर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक ०८/०२/२०२४ रोजी दिले पूढे नेमलेली तारीख ०९/०३/२०२४

Sd/-
तालूका दंडाधिकार तथा
तहसीलदार उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १२८/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Mudrikabai W/o. Vitthal Bhandare हे R/o. Tondchir Tq.Udgir Dist.Latur दिनांक २७/०७/२०२३ रोजी At. Tondchir Tq.Udgir Dist. Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Sneha W/o. Sudhakar Bande, Age 53, Occu- H.H. R/o. Chimachiwadi Tq.Udgir A/p Navi Mumbai, Thane
2) Usha W/o. Sanjay Lanjile, Age 47, Occu- H.H. R/o. Udgir A/p Chincvadgao, Pune

यांनी खालील नमूद २ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Sneha W/o. Sudhakar Bande | 53 | Daughter |
| 2) Usha W/o. Sanjay Lanjile | 47 | Daughter |

अर्जदार याने Mudrikabai W/o. Vitthal Bhandare या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Mudrikabai W/o. Vitthal Bhandare यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः २१/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः ०२/०४/२०२४

आदेशावरुन

(के.डी.सुर्यवंशी) कनिष्ठ लिपिक २ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायालय क. स्तर, उदगीर यांच्या न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६४/२०२४ निशाणीक्रमांक०६

ज्याअर्थी नामे Suman W/o. Tukaram Halaspure हे दिनांक १५.११.२०२३ रोजी Udgir Tq.Udgir Dist.latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

Ramesh S/o Tukaram Halaspure
Age 53 Yrs Occ. Service
R/o Harkare Nagar, Udgir Dist.Latur
VERSUS .....Applicant

1) Sapana Tulshidas Halaspure Age 53 Yrs Occ.
2) Arjun Tulshidas Halaspure Age 53 Yrs Occ.
3) Vaishnavi Tulshidas Halaspure Age 15 Yrs Occ. Education
Minor App.No.2 and 3 are U/g. of their natural Mother i.e. Non-Applicant No.1 Sapna W/o Tulshidas Halaspure
4) Govind Tukaram Halaspure Age 37 Yrs Occ. Business
5) Nanda Tukaram Halaspure (Nanda W/o Raju Mangle) Age 32 Yrs Occ. H.H.
All R/o Nanded Road, Harkare Nagar, Udgir Dist.Latur ...Non-Applicant

यांनी खालील नमूद ६ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Ramesh S/o. Tukaram Halaspure | 53 | Son |
| 2) | Sapana Tulshidas Halaspure | 31 | Daughter in law |
| 3) | Arjun Tulshidas Halaspure | 17 | Grand son |
| 4) | Vaishnavi Tulshidas Halaspure | 15 | Grand Daughter |
| 5) | Govind Tukaram Halaspure | 37 | Son |
| 6) | Nanda Tukaram Halaspure | 32 | Daughter |

अर्जदार याने Suman W/o. Tukaram Halaspure या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Suman W/o. Tukaram Halaspure यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः ३१/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः १५/०३/२०२४

आदेशावरुन

(संतोष डि.शिंदे) कनिष्ठ लिपिक सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३४/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Ankush Laxman Biradar हे R/o. Kallur Tq.Udgir Dist.Latur दिनांक ०६/१२/२०१९ रोजी At. Kallur Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार

1) Kevalbai W/o. Ankush Biradar, Age-78, Occu. - H.H.
2) Vitthal S/o. Ankushrao Biradar, Age-46, Occu. - Agri
3) Baliram S/o. Ankushrao Biradar, Age - 43, Occu. - Agri
4) Siddheshwar S/o. Ankushrao Biradar, Age- 40, Occu.- Agri
All R/o. Kallur Tq. Udgir Dist. Latur
5) Nirmalabai W/o. Ramesh Jadhav, Age-60 Occu- H.H. R/o. Muthkhed Tq. Aurad Dist. Bidar
6) Sumanbai W/o. Omprakash Dhobale, Age-58 Occu - H.H. R/o. Umarga Retu Tq. Jalkot Dist. Latur

यांनी खालील नमूद ६ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|
| 1) Kevalbai W/o. Ankush Biradar | 78 | Wife |
| 2) Vitthal S/o. Ankushrao Biradar | 46 | Son |
| 3) Baliram S/o. Ankushrao Biradar | 43 | Son |
| 4) Siddheshwar S/o. Ankushrao Biradar | 40 | Son |
| 5) Nirmalabai W/o. Ramesh Jadhav | 60 | Daughter |
| 6) Sumanbai W/o. Omprakash Dhobale | 58 | Daughter |

अर्जदार याने Ankush Laxman Biradar या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Ankush Laxman Biradar यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांकः २१/०२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः ०४/०४/२०२४

आदेशावरुन

(के.डी.सुर्यवंशी) कनिष्ठ लिपिक २ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर
(एस.एम.शेटे) सहा.अधिक्षक, सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

पाहिजेत

दैनिक यशवंत विभागीय कार्यालय उदगीर येथे संपादकीय विभागात लिखाणाची आवड असणाऱ्या प्रतिनिधीची आवश्यकता आहे.

इच्छुकांनी संपर्क साधवा.
संपर्क : दैनिक यशवंत विभागीय कार्यालय नगर परिषद व्यापारी संकुल E विंग उदगीर
मो.न ९८५०२२८२४०

उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो





उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ | डॉ.अंकिता लाहोटी (DOMS) | डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.) | डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष | व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर | लॉ. प्रदिप बेद्रे सचिव




यशवंत
गुरुवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२४
उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com


## कॉपीमुक्त अभियान राबविणे बाबत

**उदगीर (प्रतिनिधी)** तालुक्यातील सर्व जनतेस आवाहन करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळामार्फत इयत्ता १२वीची परिक्षा दि. २१/०२/२०२४ ते १९/०३/२०२४ या कालवधीमध्ये परिक्षा घेण्यात येत आहे. त्या अनुषंगाने उदगीर तालुकयात कॉपीमुक्त अभियानाची संपूर्णपणे अंमलबजावणी करण्यासाठी महसूल विभाग, ग्रामविकास विभाग, शिक्षण विभाग व पोलीस विभाग यांचे बैठे पथक व भरारी पथक नियुक्त करण्यात आले आहेत. आवश्यक कार्यवाही करणे बाबत व सदरील केंद्रावर विद्यार्थी व विद्यार्थीनी हे कॉपीसह आढळून आल्यास दंडात्मक व फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

राज्यात कॉपीमुक्त परीक्षा होवून विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होण्याच्या दृष्टीने सर्व पालकांनी शैक्षणिक संस्थानी सहभागी होणे आवश्यक आहे. यासाठी सर्वांनी सहकार्य करुन कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा होण्यासाठी कटीमध्ब रहावे. अनुचित प्रकार घडु नयेत याची दक्षता सर्व संबंधित यंत्रणांनी घ्यावी असे आवाहन श्रीमती वर्षा ठाकुर-घुगे जिल्हाधिकारी लातूर, सुशांत शिंदे उपविभागीय अधिकारी उदगीर, राम बोरगावकर तहसिलदार उदगीर यांनी केले आहे.

# उदगीरात २००० विद्यार्थ्यांचा जागतीक सूर्य नमस्कार उत्साहात साजरा



**उदगीर (प्रतिनिधी)** ज्येष्ठ नागरिक संघ व पतंजली योग समिती उदगीर यांच्या विद्यमाने दरवर्षी जागतिक सूर्यनमस्कार अविष्कार दिन रथसप्तमीच्या दिवशी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. गेल्या पंधरा वर्षापासुन या दोन सामाजिक संघटनेच्या माध्यमातून हा उपक्रम राबवला जातो या उपक्रमाचे प्रणेते स्वर्गीय डॉक्टर प्रकाश राव देशपांडे यांनी हा उपक्रम सुरू केलेला होता

आज या कार्यक्रमात २१ शाळांनी सहभाग घेतला वास्तविक पाहता सूर्यनमस्कार हा एक खूपच चांगला असा शारीरिक आरोग्यासाठी उपयोगी असा प्रकार आहे यामध्ये असणाऱ्या बारा स्टेप्स त्यातील सर्व आसने शरीराच्या प्रत्येक अवयवांना मिळणारा व्यायाम हा अतिशय महत्त्वाचा आहे. भावी पिढीचे आरोग्य निरोगी व्हावे, प्राचीन भारतीय सनातन संस्कृतीचा हा अनमोल ठेवा आपल्या पुढील पिढीला मिळावा यासाठी या दोन्ही संघटना स्वखर्चाने हा उपक्रम घेतात. प्रत्येक बालकाचे आरोग्य चांगले असावे, त्यांचे भावी जीवन चांगले जावे, कारण ही मुले उद्याचे भावी नागरिक आहेत. देशाचे आधारस्तंभ आहेत. ङ्गसुदृढ शरीरात सुदृढ मन वास करतेङ्घया न्यायानुसार आपली सामाजिक बांधिलकी समजून यामध्ये दोन्ही संघटना कार्यरत असतात. १६ फ्रेब्रुवारी २०२४ रथसप्तमी वार शुक्रवार या दिवशी जिल्हा परिषदेच्या मैदानावर हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आले.

याप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप भागवत सर, पोलीस उपनिरीक्षक अभय पाटील, भाजप शहर अध्यक्ष मनोज भाऊ पुदाले, मारवाडी युवा मंचचे पवन मुंदडा त्याचबरोबर प्रा.रमाकांत मधवरे ,सुरेंद्र अक्कनगिरे, ,ग्रंथ मित्र दीपक बलसुरकर सर, अनिल पत्तेवार , उमाकांत आंबेसंगे, विश्वनाथ माळेवाडीकर, धनराज बिरादार, सचिव मुरलीधर जाधव,श्रीराम चामले, हकीम साहेब,शिवमुर्ती आप्पा भातंबरे, ईश्वरचंद्र वाघमारे, शिवलिंग मठपती, सुहास केंद्रे, ज्ञानोबा बेदडे, बळवंतराव कुलकर्णी, प्रा नरेंद्र शिंदे, नरेंद्र यंदे , प्राचार्य वीरभद्र कप्पीकेरे पत्रकार कुलकणी,सुनील सोनी,पंतजली महीला तालुका अध्यक्षा सुमती भातांबरे ,श्रीमती शंकुतला आदेप्पा, मान्यवर उपस्थित होते त्याचबरोबर सर्वच शाळांचे बहुतांश प्राचार्य क्रीडा शिक्षक व २००० विद्यार्थी संख्या याप्रसंगी उपस्थित होते. विद्या वर्धिनी विद्यालय,टाइम्स पब्लिक स्कूल, सुवर्ण माता विद्यालय , आश्रम शाळा शेकापूर. या शाळांनी आपले विशेष प्राविण्य दाखवले उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कारा चे प्रात्यक्षिक दाखवले. ममारवाडी युवा मंचफने सर्वांसाठी खाऊची व्यवस्था केली होती सौ.मधुमती शिंदे मॅडम यांनी आभार प्रदर्शन केले.

सूर्य नमस्कार कार्यक्रम यशस्वी करण्यात अशोक पाटील, शिवकुमार शिरगीरे,श्रीकांत स्वामी, सुभाष तगाळे, सौ मिनाक्षी स्वामी त्याचबरोबर सर्व सहभागी योग शिक्षक, मुख्याध्यापक विद्यार्थी व विद्यार्थिनी क्रीडा शिक्षक यांचे सहकार्य लाभले. ज्येष्ठ नागरिक संघ व पतंजली योग समिती परिवाराने सर्वांचे आभार मानले..

## पोलीस उपअधीक्षक दिलपजी भागवत व तहसीलदार रामेश्वरजी गोरे यांचा सत्कार



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील कर्तव्यदक्ष पोलीस उपाधीक्षक श्री दिलीपजी भागवत व तहसीलदार रामेश्वरजी गोरे यांचा प्रा कुमार बिरादार सर यांच्या निवासस्थानी दोघांचाही निरोप समारंभ निमित्त यथोचित सत्कार करण्यात आला. तहसीलदार रामेश्वरजी गोरे साहेबांनी मागील तीन वर्षापासून उदगीरचे तहसीलदार म्हणून आपल्या कार्याचा एक वेगळा ठसा निर्माण केला . त्यांच्या कार्यकाळात उदगीरच्या तहसील कार्यालयाची नवीन वास्तू उभी राहिली. तहसीलदार गोरे साहेब हे उदगीर परिसरात एक अभ्यासू व शिस्तप्रिय अधिकारी म्हणून परिचित आहेत. त्यांची नुकतीच कंधार येथे बदली झाल्यामुळे कुमार बिरादार सर व मित्र परिवाराच्या वतीने उदगीरचे उद्योजक श्री भागवतअण्णा केंद्रे व श्री नरसिंगण्णा घुगे यांनी शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला व पुढील कार्यासाठी मनः पूर्वक हार्दिक शुभेच्छा दिल्या .

दुसरे सत्कारमूर्ती उदगीरचे उपविभागीय पोलीस कार्यालयातील पोलीस उप-अधीक्षक ज्यांनी अल्पकाळामध्येच उदगीरीच्या कायदा व सुव्यवस्था प्रश्न अगदी आपल्या कौशल्याने हाताळला असे श्री दिलीपजी भागवत साहेब यांचा सत्कार उदगीरचे सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ तानाजी मोरे व युवा उद्योजक श्री घाळेप्पा वल्लुरे, मनोजभैय्या कलबुर्गे, माजी नगरसेवक नागेशभैय्या अष्टुरे व प्रा कुमार बिरादार सर यांनी केला. यावेळी सत्कारमूर्ती श्री दिलीप भागवत म्हणाले कि मला जरी उदगीर येथे सेवेचा कमी कार्यकाल मिळाला असला तरी माझ्या ३३ वर्षाच्या सेवेत काम करण्याचा सर्वाधिक आनंद उदगीर येथे मिळाला. उदगीर करांनी दिलेले प्रेम व त्यांचे सहकार्य ते मी कधीही विसरू शकत नाही त्यांच्या सहकार्यामुळेच उदगीर शहरात मागील सात महिन्यापासून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मला यश आले अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.दुसरे सत्कारमूर्ती श्री रामेश्वर गोरे साहेब म्हणाले की माझ्या तीन वर्षापेक्षा अधिक कार्यकाळात मलाही उदगीर हे माझे जणू गावच आहे असे समजून मी या ठिकाणी राहिलो. प्रशासन चालवत असताना उदगीर करांची मिळालेली साथ ही माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली, म्हणूनच मला तीन वर्षापेक्षा अधिक काळ येथे तहसीलदार म्हणून चांगल्या पद्धतीने काम करता आले. येथील लोकांनी दिलेले प्रेम हे मी कधीही विसरू शकत नाही अशा भावना व्यक्त केल्या. प्रा. कुमार बिरादार सर यांच्या निवासस्थानी नेहमीच समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या कर्तुत्वान मान्यवरांचा सत्कार केला जातो. आजपर्यंत असंख्य गुणवंत विद्यार्थी, यशस्वी उद्योजक, असंख्य कर्तव्यदक्ष अधिकारी व समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांचा सन्मान प्रा. कुमार बिरादार सर यांनी केला आहे.

## बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे यांचा सत्कार



उदगीर (प्रतिनिधी) कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे यांच्या वाढदिवसानिमित्त आडत व्यापारी वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी तालुका काँग्रेसचे अध्यक्ष कल्याण पाटील, बाजार समितीचे संचालक ज्ञानेश्वर पाटील, अॅड. पद्माकर उगीले, जगदिश बाहेती, रविंद्र कोरे यांच्यासह आडत व्यापारी वेल्फेअर असोसिएशचे अध्यक्ष श्रीधर बिरादार, उपाध्यक्ष शिवशंकर बिरादार, साईनाथ कल्याणी, सचिव मनोहर बिरादार, सहसचिव नागेश आंबेगावे, कोषाध्यक्ष चंद्रक्रात बिरादार, सहकोषाध्यक्ष शरद दंडिमे, सुनिल पाटील, उमाकांत पांढरे, दिलीप जाधव, श्याम बिरादार, मल्लिकार्जुन रेगुडे, मारोती कडेवार, निलेश कालानी, शिवाजी पेठे, प्रमोद पाटील, दत्तात्रेय जगळपुरे, संजय बिरादार, अरविंद जिरगे, कमलाकर भंडे, चंद्रकांत बिरादार यांच्यासह उद्योजक सागर महाजन, सुदर्शन मुंडे, राजेश अंबरखाने, कल्पेश बाहेती, अतिश बियाणी, चंद्रकांत बारोळे यांच्यासह माउली ग्रुपचे सर्व सदस्य,उदगीर शहर व परिसरातील शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## विद्यापीठातील विविध समस्या बाबत अभाविपचे विद्यापीठ प्रशासनाला निवेदन



**उदगीर (प्रतिनिधी)** आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषद लातूर महानगराच्या वतीने विद्यापीठातील विविध समस्या बाबत अभाविपकडून विद्यापीठ प्रशासनाला निवेदन दिले आहे.

लातूर शहरातील विविध महाविद्यालयाच्या प्राचार्या माफर्फत तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र पेठ येथील संचालक प्रा.राजेश शिंदे यांच्या माफर्फत कुलगुरूंना निवेदन देण्यात आले.यामध्ये विद्यार्थी परिषदेने प्रामुख्याने तीन मागण्या यामध्ये केल्या आहेत. सध्या मराठवाड्यामध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे विद्यापीठाने चालू सत्राचे परीक्षा शुल्क व आगामी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे शैक्षणिक शुल्क माफकरण्यात यावे. ज्या विद्यार्थ्यांनी पुनमूल्यांकन चे फर्फॉर्म भरले आहेत अश्या विद्यार्थ्याचे निकाल येत्या १५ दिवसाच्या आत निकाल लावावे. पुनर्मूल्यांकना मध्ये ज्या विद्यार्थ्याचे गुणांमध्ये बदल झाला अश्या विद्यार्थ्याचे पुनमूल्यांकनाचे शुल्क परत करण्यात यावे. अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आले आहे. यावेळी अभाविप महानगरमंत्री सुशांत एकोर्गे असे म्हणाले विद्यापीठाचे निकाल वेळेवर लागले नसल्यामुळे विद्यार्थ्या मध्ये संभ्रमाचे वातावरण आहे.पुनर्मूल्यांकन व फर्फेरपरीक्षा याचे फॉर्म एकदाच भरून घेतले जात आहेत पुनर्मूल्यांकनाचे निकाल वेळेवर लावून मगच फर्फेरपरीक्षा फर्फॉर्म भरून घेतले जावे व विद्यार्थ्याची आर्थिक लूट विद्यापीठाने करू नये.ङ्घ की जर वरील मागण्या लवकरात लवकर मान्य कराव्यात अन्यथा विद्यापीठ प्रशासनाला विद्यार्थ्याच्या तीव्र रोषास सामोरे जावे लागेल असा इशारा त्यांनी दिला.

यावेळी पश्चिम नगर मंत्री सागर वाडीकर ,सहमंत्री तेजुमई राऊत,अभिजित बोरोळे, चैत्यन चेलकर, नागेश पाटील,प्रवीण शिंदे,राम जाधव,अक्षय स्वामी व इतर विद्यार्थि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवराय हे लोककल्याणकारी राजे होते - प्रा.डॉ. दत्ताहरी होनराव



**उदगीर (प्रतिनिधी)** रयतेचे राज्य, लोककल्याणकारी राज्य निर्माण करायचे असेल तर समाज आपल्या सोबत हवा. म्हणून त्यांनी अठरापगड जातींना सोबत घेतले. प्रसंगी आपल्या समाजाचा विरोध पत्करला, परंतु दौलत खानसारख्या अनेकांना प्रमुख बनवले. जे लोक शेती व समुद्रावर जीवन जगत होते, त्यांना क्षत्रिय बनवले. महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी सत्तेचा वापर केला. या वेळी घोरपडे, शिर्के, निंबाळकर, खेडसावंत हे सर्व मराठे महाराजांच्या विरोधात गेले. तरीही त्यांनी त्याचा विचार केला नाही. या त्यांच्या विचारसरणीतून लोककल्याणकारी धोरण स्पष्ट होते असे अभ्यासपूर्ण विवेचन हावगीस्वामी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दत्ताहरी होनराव यांनी केले. ते जी.एस.पी.एम.कॅम्पसमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्यात बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष बापुसाहेब राठोड हे होते.यावेळी मंचावर संस्थेच्या उपाध्यक्षा तथा जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. ज्योतीताई राठोड, सचिव अमित राठोड, प्राचार्य डॉ. पी.डी. जाधव, प्राचार्य विजय येळवंटगे , प्राचार्य सौ.प्राजक्ता मरशिवणे , प्राचार्य पी.आर. राठोड व मुख्याध्यापिका सौ.टी.बी.शेरे मॅडम हे होते.

पुढे बोलताना डॉ. दत्ताहरी होनराव म्हणाले,तत्कालीन समाजव्यवस्थेने सर्व बहुजन समाजाला प्रतिष्ठा, सन्मान व जीवन नाकारले होते. यासाठी महाराजांनी महार, मांग, रामोशी, मदारी, साळी, कोळी, बंजारा, न्हावी आणि मुस्लीम यांसारख्या असंख्य जातींना क्षत्रित्व प्राप्त करून दिले. त्यांना शूद्र किंवा अस्पृश्य न मानता आपले सवंगडी, स्वराज्याचा घटक मानले. अध्यक्षीय समारोपात बापूसाहेब राठोड यांनी छत्रपती शिवाजी महाराजाचे चरित्र विद्यार्थ्यांनी आचरणात आणावे व राष्ट्रनिष्ठा जपावी असे सांगून कार्यक्रमाच्या सुनियोजनाबद्दल आनंद व्यक्त केला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव अमित राठोड यांनी केले. मशागत रॅलीचे उद्दिष्ट व सकाळी सहा पासून कार्यक्रमाचे नियोजन कसे केले हे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांनी सामुहिक अभिनय, पोवाडा, शिवस्त्रोत गायन केले. चारही कॉलेजचे प्राध्यापक,शिक्षक ,विद्यार्थी , विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.पी.एस.बिरादार यांनी केले तर आभार प्रा.ए.पी. पट्टेवाड यांनी मानले.